# THE BOOK WAS DRENCHED

UNIVERSAL LIBRARY
OU_192867
UNIVERSAL LIBRARY

# लतिका

कुमारी गीता जनार्दन साने
एम्. एस्सी.

प्रकाशक—
गोपाळ गोविंद अधिकारी
महाराष्ट्र प्रकाशन संस्था
गोवर्धनभुवन, खेतवाडी, मुंबई नं. ४.

या पुस्तकाच्या पुढील आवृत्तीचा हक्क प्रकाशकांच्या स्वाधीन आहे

प्रकाशन ता. १५ जानेवारी १९३७.

किं. रु. १

मुद्रक—
रघुनाथ दिपाजी देसाई,
न्यू भारत प्रिंटिंग प्रेस,
६ केळेवाडी, गिरगांव, मुंबई.

# ल ति का

# वेडा

‘ राधे ! राधे ! ! ’

ती करुण हांक राधेचें अंतर भेदून गेली. तिनें नकळत निःश्वास टाकला व ती खाडकन् मागें वळली.

दूर अंतरावर—तीस पावलांवर—एक वेडा बसला होता. हातवारे करून तोच ओरडत होता, ‘ राधे ! राधे ! ! ’

राधा गोंधळली. आपण कां मागें वळलों तिलाच समजेना. सुखदा—तिची चौदा वर्षांची भाची हंसत म्हणाली.

“ मामी किती घाबरलांत हो ? ”

नकळत आपला हात उचलून तिनें कपाळावर फिरविला. आपल्या आवडत्या व्यक्तींच्या कित्येक संवयी आपण आत्मसात् करितों अनेकदां. तिनेंही ही संवय अशीच आत्मसात् केली होती एकेकाळीं. ऋतु बदलतांच झाडावरचीं फुलें आपोआप मावळतात. परंतु वसंतोद्गमीं कळ्यांनीं वृक्ष फिरून बहरतात. ह्या संवयीनें गेलीं कांहीं वर्षें राधेला सोडलें होतें. पण आज तो विशिष्ट आवाज कानीं पडतांच फिरून जुन्या सृष्टींत ती विरली. भोंवतालचा भाग मात्र तिला स्पष्ट दिसेना.

‘ भावास्थिराणि जननान्तर सौहृदानि ’ ह्या भवभूतीच्या वचनाप्रमाणें आपल्या गतायुष्याशीं ह्या आवाजाचा संबंध आहे कीं, जन्मांत वाळून गेलेलीं उपवनें ह्या पावसानें फिरून शिंपलीं आहेत तिला समजेना. ती आठवण्याचा प्रयत्न करीत होती.

तें नांव—तें उपवन—अगदीं तोंडावर आहे असें तिला वाटत

होतें. पण ज्यास्त प्रयत्न करितांच स्मृति मेघव्यास होई; हाताशीं आलेला पेला योजनें दूर जाऊन पडे.

सुखदा आणि बरोबरचा विद्यार्थी गोविंद दोघेंहि मधून मधून प्रश्न विचारीत आणि लक्ष नसल्यानें ती विचुक उत्तर देई व दोन्हीं मुलें हंसूं लागत.

" मामी माणसें वेडीं कशानें होतात ? "

" अं ? "

" माणसें वेडीं कां होतात ? "

" माणसें ? वेडीं ? " आणि ती फिरून समाधिमग्न होई.

तिघेंजण बालाजीच्या मंदिरांत जात होतीं. राधा नवीन असल्यानें तिला मंदिर माहित नव्हतें म्हणून मुलें बरोबर आलीं होतीं.

विचारतंद्रींत असलेली राधा रस्त्यांतल्या लहानशा दगडावर ठेंचाळली व पडतां पडतां सांवरली. मुलें हंसूं लागलीं. सुखदा ज्यास्त चाणाक्ष होती.

" मामी, तुम्हांला कांहीं होतें आहे का ? "

" नाहीं हो ! कांहींसुद्धां नाहीं ! " पण तिच्या सहानुभूतीच्या शब्दांनीं तिला आंवढा गिळावा लागला.

" मग तुम्ही अशा चिंताक्रांत कां दिसतां ? "

राधेच्या मनावर एक विवक्षित मूर्ति उमटून गेली होती. तिचाच विचार तिला भासवूं लागला होता. सुखदेला कांहींतरी उत्तर तिनें दिलें आणि आपल्या विचारांत ती मग्न झाली.

जें शोधीत होती तें तिला सांपडलें होतें. कुमारचा आवाज होता तो. नव्हे, कुमारचा आवाज अगदीं असाच होता. पण आवाज कुमारचा असला तरी त्या आवाजाचा उत्पादक कुमार ? तिचें अंग शहारलें. रस्त्याच्या कडेला बसून बडबड करणारा वेडा—कुमार ?

ती देवालयाच्या पायऱ्या चढून आंत गेली. देवापुढें तांदूळ पैसा

टाकून तीर्थ घेतलें व त्याचा ओला हात डोळ्याला लावला. नमस्कार करून ती क्षणभर मागें सरकून बसली.

मूर्ति बरीच उंच—सरासरी अडीच हात—रेखीव व प्रमाणबद्ध म्हणून दर्शनीय होती. परंतु राधेला घनश्याम मूर्ति दिसली नाहीं. मूर्तीच्या दोन्ही बाजूंला तेवणाऱ्या नंदादीपांची तिला दाद नव्हती. तिला एकच मूर्ति—एक आवाज—एकच चेहरा दिसत होता—कुमारचा.

तें एक विरलेलें स्वप्न होतें. कुमार खरेंच का आपल्या निर्जल आयुष्यांत फुले फुलवून गेले ? पण कुठें ?

तिच्या डोळ्यांतून अश्रूवर्षाव होऊं लागला. हताशपणें ती मागच्या भिंतीवर टेकली.

सुखदा तीर्थ घेऊन आपल्या मैत्रिणींत गुंगली होती. मामीकडे तिचें लक्षच नव्हतें. राधा जरा वेळानें भानावर आली, तिनें डोळे पुसले व ती घरीं जावयास उठली.

तो वेडा म्हणजेच आपला कुमार हा विचार तिला सोडीना. मुलांना कांहीं माहिती असेल अशी आशा तिला वाटली.

" कोण आहे हो तो वेडा, सुखदाताई ? "

" मामी वेडा आहे तो. "

" वेडा खराच हो, पण त्याला कोणी नाहीं का ! त्याच्या घरची मंडळी त्याला रस्त्यावर कशी भटकूं देतात ? "

" त्याला नाहींच कोणी. एकटा आहे तो. " गोविंद म्हणाला.

" काय करीत असे वेडा होण्यापूर्वी ? "

" कोणास ठाऊक ! तो आमच्या गांवचा नाहीं. इथें एक घोडपेकर सबजज्ज होते; त्यांच्याकडे पाहुणा आला होता तो. आणि इथेंच तो वेडा झाला. "

" गरीब बिचारा ! मरण बरें पण वेडपणा नको. काय जिवाचे हाल ! "

" आणि चांगला शिकलेला आहे तो माणुस मामी. काका म्हणतात प्रोफेसर होता तो. "

राधा चरकली. आपला अंदाज खरा ठरल्याबद्दल तिला फार विषाद वाटला. वेड्याकडे न्याहाळून पाहण्याचा तिनें निश्चय केला होता.

वेड्याचा आवाज तिला दुरूनच ऐकायला आला. तिचें मन थरारलें. उत्सुकता व भीति ह्या दोन्ही विकारांनीं तिला अस्वस्थ वाटत होतें.

......... एकच क्षण ! तिची त्याची दृष्टभेट झाली. त्याचा चेहरा भकास, दृष्टि शून्य होती. अनेक दिवसांची दाढी त्याच्या चेहऱ्यावर वाढली होती. तरीहि एके काळीं तिला प्राणाहून वाटणाऱ्या चेहऱ्याची रूपरेखा–काल पाहिल्याप्रमाणें तिच्या मनावर कोरली गेली होती. आंतल्या बाहेरच्या चेहऱ्याचें विलक्षण साम्य तिला तात्काळ समजलें. तें धरधरीत लांब नाक, उंच कपाळ, तिच्या नजरेंतून तीं सुटलीं नाहींत.

कुमार–कुमारच हे ! तिचें हृदय अश्रु गाळीत म्हणाले.

" हाय कुमार ! काय झालं हो हें ?"

तिच्या पापण्यांवर तरंगणारें पाणी मुलांच्या ध्यानांत आलें नाहीं. कारण त्यांचा अजून त्या वेड्याबद्दलच संवाद चालू होता.

" गोविंदा, निजतो कुठें रे हा वेडा ? "

पुष्कळदां रस्त्याच्या कडेलाच निजलेला दिसतो. पण अनेकदां तो तिथून नाहींसा होतो. शेजारच्या करवंदीच्या जंगलांत जातो म्हणे ! "

" अरे बापरे ! वाघाची भीति नाहीं वाटत त्याला ? "

" अग ताई, तो खरोखर वेडा आहे; वेड्याचें सोंग नाहीं करीत कांहीं."

" त्याला जेवायला कोण घालतें ? कीं जेवतच नाहीं तो ? "

" ठाऊक नाहीं कोण घालतें तें, पण मला वाटतें भोंवतालचे लोक शिळापाका तुकडा टाकीत असतील. "

राधेच्या कानांवर कांहीं भाग पडत होता. तिनें मध्येंच पिळवटून विचारलें.

" त्याचे मित्र कसे सोडून गेले त्याला इथें ?"

" नेणार होते त्याला पण ऐनवेळीं तो बेपत्ता झाला. त्यांनीं इलाजहि पुष्कळ करवले, पण फायदा नाहीं झाला कांहीं."

" किती दिवस आहे तो इथें ?"

" झालीं असतील दोन वर्षें, "

राधेनें एक निःश्वास टाकला. मुलांना वाटलें मामी कोमल मनाच्या आहेत; त्यांना इतरांचें दुःख पाहावत नाहीं.

........घरीं कामाचा ढीग पडला होता. सुखदेच्या वडील बहिणीची–लतेची उद्यां मंगळागौर होती. पहिली वहिली मंगळागौर–धडाका उडायचा होता. अशा वेळेला मदत हवी घरांत, म्हणून राधा नणंदेच्या घरीं आली होती. दिवसभर कडबोळीं–चकल्या तळून फराळाचें सामान करून, राधा थकली होती. तिच्या नणंदेला तर सायंकाळीं थोडा कडमोडहि आला. त्यामुळें स्वयंपाक राधेच्याच गळ्यांत होता.

......तिचा रामू रडत उठून खळें करीत होता. तिच्या विमनस्क मनाला ही मात्रा चांगली पोंचून ती शुद्धीवर आली. दुपारीं तीनला त्याला तिनें घेतला होता. नंतर सगळा वेळ कामांत गेला. ती रिकामी झाली तेव्हां तो झोपला होता.

तिनें त्याला चटकन् उचलून घेतलें.

" कांरे राजा, काय झालं रडायला ?"

श्रावणाचे दिवस आकाश भरून आल्यानें जरा तगमग होत होती. त्यांत संध्याकाळ म्हणजे मुलांची रडण्याची वेळ, आणि रामू निजून उठलेला.

तिनें त्याच्या डोळ्यांला पाणी लावलें.

" बाळाला दुदु हवं आहे का ?"

तिनें वाटींत दूध साखर घालून वाटी त्याच्या तोंडाला लावली.

......बाळाला हृदयाशीं घट्ट धरून तिनें त्याचा पापा घेतला.

" आइखी पापी देले लाजा....आंखी एक ! गोल, खूप गोल आहे !"

"......आतां पुले हं. आतां किनई आपन छैपाक कलूं हं. तूं जा बाहेर खेळायला गोविंद, ने रे याला."

रामूचें तोंड फिरून सुरकुतलें. त्यानें तोंड फिरवून मुरका मारला.

"जा राजा. शानी आहे माझी बाबी."

पण राम ऐकेना.

जबरीनें तिनें त्याला गोविंदाच्या खांद्यावर दिला. तो जोरानें रडूं लागला. तिच्या हृदयाला तो आवाज भेदून गेला.

तिला कुमारची फिरून आठवण झाली.

"हाय! कुमार! तुम्ही व राम दोन माझे प्राण. एकापासून दुसरा किती दूर!"

ती स्वयंपाकाला लागली. पण तिचें लक्ष कामांत नसल्यानें भाजी चिरताना बोट कापलें व बोटाला रक्ताची धार लागली.

लता तिला मदत करण्यासाठीं आली. पण तिला आज एकांत हवा होता. निर्जन वनांत जावें असें तिला वाटत होतें. मानवी शब्द कडकडीत तेलाप्रमाणें तिला तापदायक वाटत होता.

म्हणून ती लतेला म्हणाली,

"ताई, स्वैंपाक थोडा आहे. मी करतें. शिवाय चार दिवस माहेरीं आलां आहांत. घ्या विश्रांति थोडी. काम लागलेंच आहे जिवाला आतां."

"पण मामी दिवसभराच्या दमलेल्या आहां तुम्हीं."

"असूं द्या हो. आम्हांला झाली सवय आतां."

लता निघून गेली. राधेचे हात कामांत होते. देह स्वयंपाकगृहांत होता. मन—मन मात्र दूर दूर भटकत होतें. मधून मधून अंतरांत भावना उचंबळून नेत्रावाटे वाहूं लागत. ती सारखा विचार करीत होती.

"काय झालें! कसें झालें!"

तिचें हृदय आक्रंदून म्हणत होतें,

"हाय कुमार! केवढा प्रचंड सागर पसरला आपल्यांत! कसं झालं हो हें!"

*

# राधा

जगांत येतांना राधेला घाई झाली व ती स्वर्गाचें दार उघडें टाकून आली, आणि तें बंद करायला तिच्या आईला जावें लागलें. राधा पोरकी झाली.

लग्नानंतर अठरा वर्षें घरांत मूल नव्हतें. दुसरें लग्न करण्यासाठीं हरिहररावांमागें तग्गा लागला होता. आणि अशा वेळेला राधेचें आगमन म्हणजे मोठा आनंदोत्सव. परंतु काळाच्या एका फटकाऱ्यानें तिच्या जीवनसरितेचा ओघ फिरवून टाकला.

मातृविहीन अर्भकांचे जे रीतसर हाल व्हायचे ते राधेचेही झाले. तथापि आजी होत्या तोंवर 'आई वेगळी' म्हणून त्यांचें तिच्याकडे पुष्कळ लक्ष असे.

राधा अडीच वर्षांची असतांना सगुणाबाई आल्या. इतरांच्या शिकवणीनें ती त्यांना 'आई' म्हणायला शिकली. आजींनीं आणखी एका वर्षांत राम म्हटला.

राधा आपल्या आईच्या प्रेमाचा अनुभव घ्यायला मागें राहिली.

राधा दिसायला साधारणच होती. उलट किशोरी—सगुणाबाईंची मुलगी दिसायला फार सुंदर. सगुणाबाईंना तिचे लाड करण्याची व तिला सजवण्याची फार आवड. शिवाय प्रत्येकानें किशोरीची प्रशंसा करायची. राधेला फार वाइट वाटे त्यामुळें. परंतु दोघी बहिणींचा एकमेकींवर अतोनात जीव होता.

वृद्धपणची दुसरी बायको. हरिहरराव हळुहळु तिच्या आधीन झाले. राधेला किशोरीप्रमाणेंच पत्नीनें वागवावें असें त्यांना वाटे. परंतु त्याबाबत बोलण्याचा मात्र धीर नव्हता.

राधा जसजशी मोठी होऊं लागली तसतसा कामाचा भार तिजवर पडूं लागला. हरिहरराव श्रीमंत नव्हते. पोटापुरेसें शेतीचें उत्पन्न त्यांना होतें. त्यामुळें स्वयंपाक सगुणाबाई स्वतःच करीत. राधेवर प्रथम उष्टीं-शेणं, सडासारवण, नंतर पाणी काढणें हीं कामें पडलीं. चवदा वर्षांच्या त्याला स्वयंपाक आणि जरूर तर धुणेंपाणी तीच करी. किशोरी अनेकदां तिच्या मदतीला जाई पण आईच्या धपाट्यांनीं दोघीहि जर्जर होत.

सगुणाबाई शहरांतल्या होत्या. हरिहररावांच्या घरची खेडवळ राहणी त्यांना पसंत नसे; पण आईबापांनीं ' सांदीकोचर्डीत ' घातली, त्याला त्यांचा उपाय नव्हता. तथापि त्यांनीं आपलें खेडवळ घर शहरच्या थाटावर सजवण्याचा प्रयत्न केला होता. त्यांच्या घरांत हार्मोनियम तर होताच पण ग्रामोफोनही आणवला त्यांनीं.

राधेला हार्मोनियमचें फार वेड लागलें होतें. पण सगुणाबाई बाहेर गेल्या आल्या तरच त्याला हात लावायला ती धजे. फोनोचीं गाणीं मात्र पुष्कळच ऐकून पाठ झालीं होतीं. किशोरीचें लक्ष पुस्तकांत ज्यास्त. त्यामुळें तिला गाण्याचें अंग फारसें नव्हतें. त्याचाहि सगुणाबाईना हेवा वाटे.

" आई, ताईचा आवाज किती गोड आहे नाहीं ग ! "

" कुणाला जायचं आहे दाखवायला ? " कपाळाला आठया घालीत त्या म्हणत......

" इश्श ! मला कशाला गाणें शिकायला सांगतेस तूं ? "

.......सगुणाबाईच्या आग्रहामुळें किशोरी शाळेंत जाऊं लागली, आणि राधेलाहि हरिहररावांनीं शाळेंत घातली. सावत्र आईच्या हातून तितकीच सुटका ! त्यांना वाटलें.

घरकाम करुन शाळा, शिवाय राधेची बुद्धीही तितकीशी तेजस्वी नव्हती; किशोरी नेहमीं वर्गात पहिली येई. उलट राधा कशीतरी उत्तीर्ण व्हायची. सगुणाबाईंना दोघींमध्यें तुलना करायला अवसर मिळे. त्यामुळें तिच्या शिक्षणांत त्यांनीं व्यत्यय आणला नाहीं.

इंग्रजी चार यत्ता झाल्यावर किशोरीला हायस्कूलमध्यें वसतिगृहांत पाठवावयाचें ठरलें. पण एकटीच जायला ती तयार नव्हती. सगुणाबाई राधेला पाठवायला नाखुष होत्या. त्यामुळें एक वर्ष दोघी घरींच होत्या. त्या उन्हाळ्यांत किशोरीची मावशी आपल्या मुलींना घेऊन पाहुणी आली. शिकलेल्या भाच्या पाहून सगुणाबाईंना हेवा वाटला. परंतु किशोरी हट्ट सोडीना. तिला वसतिगृहांत राहण्याची फारशी इच्छा नव्हती. कारण घरीं ती नियमबद्ध नव्हती. त्यामुळें बाहेर आपलें स्वातंत्र्य कमी होईल असें तिला वाटे.

सगुणाबाईंनीं हार खाल्ली. हरिहरराव व राधा ह्यांना बोटाच्या तालावर नाचविणाऱ्या सगुणाबाई नमल्या. राधा व किशोरी वसतिगृहांत गेल्या.

राधा अभ्यासांत चमकली नाहीं. ती अभ्यासू होती. ती नापासही कधीं झाली नाहीं. तिच्या कामसू स्वभावाला परोपकाराचें क्षेत्र शाळेंत मोकळें झालें. राधा शाळेंत सर्वांची आवडती होती.

शाळेचीं तीन वर्षें हंसत निघून गेलीं. अखेरचा निरोप घेतांना राधेच्या मनाला फार दुःख झालें. 'पुढें काय ?' हा प्रश्न तिच्यापुढें होता. तिचें भविष्य तिच्या हातीं नव्हतें. गेलीं तीन वर्षें बारांपैकीं दोन महिने सगुणाबाईंना खूष ठेवणें सोपें जाई. पण आतां काय ? ह्या बंदीवासांतून सुटका केव्हां होईल कोण जाणें. तिला एकट्या किशोरीचा आधार होता. आणि किशोरीही मोठी झाल्यामुळें पुष्कळ बाबतींत माता पितरांवर अधिकार गाजवूं लागली होती.

मुलींच्या लग्नाचा प्रश्न घरांत गाजत होता. ‘ मी कॉलेजांत जाणार ’ किशोरीनें स्वच्छ सांगितलें.

“ तूं कॉलेजांत जा. तुला कोण नको म्हणतें आहे ? मुलगा काय एका दिवसांत मिळणार आहे ? ”

“ ह्याचा अर्थ काय ? तुम्हांला जांवई सांपडला कीं तुम्ही पोरी उजवणार ? मी साफ लग्न नाहीं करायची. ”

“ किशोर, आपल्या जातींत मुलें नाहीं मिळत. ”

हरिहररावांची पोटजात फार लहान व मागासलेली होती. जातीबाहेर लग्न करण्याचा अजून प्रघात पडला नव्हता.

“ नसतील मिळत. जातीशीं काय करायचें आहे ? लग्न करावेसें वाटेल तेव्हां पाहीन मी—पुढचें पुढें ! उद्यां प्रवासांत जेवायला मिळायचें नाहीं म्हणून दुप्पट खातें का कोणी आज ? ”

“ हद्द आहे तुझ्यापुढें. तूं बापाला बाप म्हणत नाहींस—”

“ ती आजाला आजा नाहींच म्हणणार. ”

“ राहूं दे तुझं लग्न ! तुझ्या लाडक्या ताईचं करायला तर हरकत नाहीं तुझी ? ”

“ तें तिला विचार; माझ्याशीं नाहींना लावणार तिचें लग्न तूं ? ”

“ कांहीं हाड नाहीं बाई तुझ्या जिभेला.”

मॅट्रिकच्या परीक्षेंत दोघी पास झाल्या. किशोरी दुसऱ्या वर्गांत व राधा तिसऱ्या वर्गांत. मुलें पाहण्याचा धूमधडाका सुरू होता. पण प्रत्येक वेळीं मुलाच्या शिक्षणाचा प्रश्न येई. मुलगी मॅट्रिक, मुलगा बी. ए. तर खरा.

निकाल लागतांच बनारसला जाण्याचें किशोरीनें ठरविलें. गतवर्षी तिची एक सखी तेथें गेली होती. तिनें राधेला नेऊं नये असें हरिहररावांचें मत होतें.

" मॅट्रिक आहे तों लग्न व्हायला इतका त्रास होतो आहे. जितकी ज्यास्त शिकेल तितका मुलगा मिळायला बराच त्रास पडेल. "

" पुढच्या वर्षी नका पाठवूं हवी तर. यंदा मी एकटी कशी राहूं तिथें ? "

" पण तुझ्यामागें कुठवर पाठवायची तिला ? "

" तिचें माझ्यावर फार प्रेम आहे. ती माझ्याजवळ सुखांत असते. तुमच्या इथें रोज पसापसा पाणीच गाळावयाचें कीं नाहीं ? "

हरिहरराव चिंताक्रांत बसले होते.

" तुम्हीं आईच्या इतके आहारीं गेलां आहांत कीं, तिनें एखाद्याचा प्राण घेतला तरी हूं का चूं नाहीं करणार तुम्ही."

किशोरीचे शब्द त्यांच्या जिव्हारीं टोंचले. पण किशोरी सत्य बोलली होती; शिवाय तिच्यावर वडिलकी गाजविण्याचा धीर त्यांना नव्हता. त्यामुळें कडू कोयनेल त्यांनीं गुपचुप गिळलें.

कॉलेजमध्यें राधेचा जुना कार्यक्रम सुरू झाला तिला पहिल्यापासूनच अभ्यास करण्याची संवय होती. पण तिचा अभ्यास नवीन परिस्थितींत तिला पुरा पडेना. त्यामुळें कॉलेजची तिला प्रथमच भीति बसली.

किशोर सोडली तर तिचें आयुष्य प्रेमहीन होतें. तिच्या जिवाला नेहमीं दूरची अज्ञात ओढ लागलेली असे. ' हें आपलें जीवन नव्हे, एक स्वप्न आहे, आपल्याला आणखीं कोठें जायचें आहे. नव्हे आपण प्रवासांत आहोंत, अशी तिची भावना होती.

ह्या अज्ञात आशेवरच ती जगत होती. किशोरीचें निर्व्याज प्रेम व भावि सुखाची आशा हे तिचे जीवनाधार होते.

घरात तिच्या लग्नाची बातमी कानीं पडली, तेव्हां तिला बरें वाटलें. ज्या अज्ञाताची आपण अपेक्षा केली तें प्रेमस्थान विवाहानें आपल्याला लाभेल अशी तिला आशा वाटूं लागली.

तेंही एक परीनें बरेंच होतें. पित्याच्या इच्छेविरुद्ध जाण्याचें धैर्य

तिला नव्हतें. कान तुटला तरी हरकत नाहीं; ही भावना तिच्या मनांत कधीं उद्भवली नव्हती. म्हणूनच तिचा सगुणाबाईच्या हाताखालीं निभाव लागला.

कॉलेजांत आल्यावरही एकाच आशेवर ती जगत होती. तिचें लक्ष अभ्यासांत लागत नसे. उदासपणें कंटाळवाणें जीवन कंठीत होती ती. कॉलेजच्या वसतिगृहांत मुली थोड्या—पंधरा होत्या फक्त. शाळेंतल्यासारख्या त्या मिळून मिसळून नसत रहात फारशा. राधेची परोपकारी वृत्ति कायम होती. पण त्या लहानशा समाजांत, तिला वाव फार थोडा होता. शिवाय तिच्या साधेपणाचा फायदाही पुष्कळ घेत व तिची चेष्टा करीत. Vanity Fair मधल्या Dobin ची अवस्था होती तिची. किशोरी तिची बाजू घेई. पण ती काय तिच्याजवळ नेहमीं असे ?

" ह्या कंटाळवाण्या नीरस जीवनाचा शेवट कधीं होईल ? स्वतःला प्रेमादरानें वागविणारा जोडीदार कधीं मिळेल ? त्याचे पाय अश्रुजलानें मी धुवून काढीन; हाय भगवान् माझी तुला कधीं दया येईल ? "

भगवंताला तिची करुणा आली. वर्ष संपतांना हरिहररावाचें पत्र तिच्या हातीं आलें.

"............ श्री. कुमार तुमच्या युनिव्हर्सिटींत प्रोफेसर आहेत. ते तुला पहायला एक दोन दिवसांत येतील. तूं फार भाग्यवान् आहेस. असें स्थळ आपल्या जातींत फार दुर्मिळ आहे.

" चांगली व आपली छाप त्यांच्यावर पाड. ते जगांत एकटे आहेत. घरांत संपत्तीला तोटा नाहीं. त्यांच्या पसंतीला उतरलीस तर जन्मभर सुखांत राहशील ... ... ... "

राधेचे डोळे वाचतांना आर्द्र झाले. ही सुखाची वार्ता धांवत जाऊन किशोरीला सांगावी असें तिला वाटलें. पण बालसुलभ लज्जेनें तिच्यानें तसें करवलें नाहीं. पत्र खिशांत लपवून ती हलुहलु खोलींत निघून गेली.

# कुमार

रविवारचा दिवस होता. किशोरी न्हाऊन केंस वाळवीत होती. राधा केंसांना तेल लावून स्नानाला जाण्याच्या विचारांत होती. इतक्यांत कहारी आली.

" आपसे मिलने कोई बाबूजी आये हैं. "

" आपल्याला ! कोण आलंय् भेटायला ? " किशोरी उद्गारली.

" पाहूं तर खरी. " राधेनें केंस आवरले. तिला किशोरीच्या सौंदर्याचा हेवा वाटला.

एक तरुण गृहस्थ—वर्ण सांवळा, नाकीं...डोळीं नीटस, तरतरीत—तिथल्या टेबलावरचें ' चाँद ' मासिक चाळीत होते.

" आप किससे मिलना चाहते हैं ? " किशोरीनें आश्चर्यानें विचारलें.

राधेला लज्जेमुळें अक्षरहि उच्चारवेना. त्यांनीं नांव सांगतांच किशोर आणखी चकित झाली. तें नांव तिला परकें वाटलें. आणि त्या गृहस्थांना शुद्ध मराठी बोलतांना पाहून तर तिच्या आश्चर्याला पारावार राहिला नाहीं.

किशोरीची धीट मनमोकळी वृत्ति नवागताच्या मनावर छाप मारून गेली. तिघेंजण कितीवेळ तरी गप्पा मारीत होतीं. तिघेंजण नव्हे दोघेंचजण—कारण राधा शेवटपर्यंत गप्प होती.

" बाबांची तुमची ओळख कुठली ? "

" कां बरं. तुमचे बाबा तुमच्यासाठीं राखून ठेवले आहेत वाटतं ! "

" असं नव्हे. पण कुठें बनारस व कुठें महाराष्ट्र ! "

" आजकाल सायन्सनें काल व अंतर यांना मर्यादा घातल्या आहेत ना ? "

सरासरी दीड तासानें ते गृहस्थ निघून गेले. गेले दोन दिवस राधेला एक तऱ्हेची गोड उत्सुकता, अपेक्षा वाटत होती. आज तिचीं साखरेचीं चित्रें पाण्यांत विरलीं.

कुमार आले आणि तिचें हृदय घेऊन गेले. तिला मोबदल्यांत काय मिळालें ? एखादा प्रेममय दृष्टिक्षेपही नाहीं. त्यांचा मोकळेपणा, त्यांची बुद्धि, प्रेमळपणा, तिच्या आसावलेल्या हृदयाला दीड तासांत तीं सगळीं सांपडली. पण तिचा परमेश्वर तिच्यावर सतुंष्ट झाला नव्हता. त्याची प्रेममय दृष्टि इतर कोठें वळली होती, निदान राधेला तसें वाटलें.

रात्रीं उशींत मस्तक खुपसून ती मुसमुसून रडली. आपण बाल्यापासून अभागी, नाहींतर आईच्या मुळांवर कां आलों असतों. आई असती तर मी सुद्धां तालेवारांत वाढलें असतें. पण नवें लुगडें दांडें म्हणतात, ते असें !

कुमार देखणे आहेत, हुशार आहेत, स्वतंत्र आहेत, आपण काय शालजोडीला घोंगडीचें ठिगळ होणार. ते तरी असें ठिगळ कां लावतील ? किशोरी त्यांना सर्वस्वी अनुरूप आहे. त्यांनीं तिच्यावर प्रेम करणें योग्य व नैसर्गिक आहे.

किशोरीला तो नवा गृहस्थ फार आवडला. ती साऱ्या दिवसभर त्याच्याचबद्दल बोलत होती. तिचा चष्मा रंगीत नव्हता. तिची वृत्ति फुलपांखराची होती. सुंदर फुल दिसलें कीं घेतलेंच चुंबन. पण राधेला मात्र किशोरीला कुमारांनीं जिंकलें असेंच वाटलें.

तीन दिवसांनीं कुमारांची चिठ्ठी आली.

"......तुमच्या सहवासांत वेळ उडून गेला. येत्या रविवारीं वनभोजनाला याल काय ?......"

चिठ्ठी राधेच्या नांवची. ती विस्मयचकित झाली. कुमारना जर किशोरी आवडते तर पत्र माझ्या नांवानें काय म्हणून ? आपण जाऊं नये असें तिला वाटलें.

"कुमार नांव आहे होय ह्यांचें ? मला माहित आहेत. आम्ही गणितासाठीं जातों मुलांच्या विभागांत. शेजारच्याच वर्गात इंग्रजी शिकवतात ते." किशोरी आवश्यक ते शोध लावीत होती.

"......ताई मग जाणार ना आपण ?"

"वसतिगृहांतून परवानगी कशी मिळेल ?"

"तूं त्यांना सांग माताजींना भेटायला."

"......पण मला वाटतें जाऊं नये."

" जाऊं या ग. मला किनई घण्याळाच्या जीवनाचा तिटकारा आला आहे."

अखेर किशोरीच्या हट्टामुळें राधेनें जाण्याचें कबूल केलें.

सारा दिवस मजेंत गेला किशोरीचा. ती फुलांमध्यें समरसली होती. कुमारही तिच्यांत गुंतले होते. दोघांची जणुं युगांची मैत्री होती.

" किती सुरेख ही पाकोळी; मी धरणार तिला."

ओचा पदर सांवरून किशोरी हलक्या पावलांनीं पुढें सरली. ती फुलापर्यंत जाईतों तें फुलपांखरूं उडून दुसऱ्या फुलावर गेलें. त्या शिवाशिवींत किशोरी अखेर यशस्वी झाली व चिमुकले पिंवळे पंख हातांत धरून आपलें विजयचिन्ह दाखवायला आली.

कुमार तिच्या अगदीं जवळ उभे राहून त्या फुलपांखराकडे पहात होते. राधेची अवस्था त्याच्या सारखीच होती. किशोरकुमारपासून सुटून दूर जावें असें तिला वाटत होतें; पण.........

" मी किनई तोंड धुवून वेणी घालणार अं." किशोरीनें साबू उचलला व ती पलीकडल्या पुष्करणीवर पळाली. कुमार तिच्या

पाठोपाठ जाणार होता. पण मधेंच राघा खिन्न मुद्रेनें एका लांकडी बैठकीवर बसलेली पाहून तिकडे वळला.

" ताई, तुम्हांला नाहीं का तोंड धुवायचें ?" राधेनें हुंदका दिला.

तिचा हात हातीं घेत कुमार म्हणाला,

" ताई, कांहीं विशेष खेदजनक झालं ? तुम्हांला बरें नाहीं वाटत ?"

राधेनें आपला हात सोडवून घेतला व हुंदका आंवरून म्हणाली,

" व्हायचें आहे काय ? जन्माची अभागिनी मी. माझें दुर्दैव माझ्या मागें हात धुवून लागलें आहे."

" अर्धवट कां बोलतां ? मी तुमचा मित्र आहे असें समजा. मला आपलें दुःख सांगा. मी तुम्हांला शक्य ती मदत करीन. शिवाय दुःख वाटल्यानें कमी होत असतें."

तिनें एक सुस्कारा टाकला.

" तुम्ही माझें दैव कसें सांधणार ? किशोरी सुंदर आहे; बुद्धिमान् आहे, तिच्याबद्दल सर्वांच्याच मनांत प्रेम उत्पन्न होतें......"

" तुम्ही राधा तर ! रडूं नका. मला तुमची सारी कहाणी सांगा..."

"......राधे, मला किशोर आवडते पण माझ्या आवडीचें रूपांतर अजून प्रणयांत झालेलें नाहीं. मला किशोर आवडते. तुझ्याबद्दल अनुकंपा वाटते. शिवाय माझ्या आयुष्यांत तुझ्यासारख्या गृहिणीची आवश्यकता आहे."

" किशोरीला काय वाटेल ?"

" किशोर फार निराळ्या वृत्तीची मुलगी आहे. दोन दिवसांत आपलें हृदय देऊन टाकण्याइतकी उदार नाहीं ती."

......किशोरी एखाद्या उमलत्या फुलासारखी दिसत होती. कुमारनें आपला हात तिच्या खांद्यावर ठेवला.

" किशोरी, मला आपला मित्र म्हणण्याची तयारी आहे का तुमची ?"

" इश्श ! तुम्ही आहांतच कीं माझे मित्र."

" ठीक पण मी लवकरच तुझा वडील मेहुणा होऊन कान उपट-ण्याचा अधिकार हस्तगत करणार आहे. "

" म्हणजे ? "

कुमार राधेकडे पाहून हंसले. किशोरी समजली व हंसून म्हणाली, " अभिनंदन ! "

......आणि वसंतांतल्या कळीप्रमाणें राधा वाढूं लागली. कुमार बहुधा रोज सायंकाळीं येत, नंतर तिघें फिरायला जात. दिवेलागणीला तिघें फिरून येत. किशोरी आंत जाई.

सायंकाळच्या रम्य अंधुक प्रकाशांत राधा—कुमार बाहेरच्या पुलावर बसत; एकमेकांकडे बघतांना—हृदयांतले भावदीप पाजळतांना कालाच्या कराल दांतांची बोंच त्यांना जाणवत नसे.

" राधे " भावनाजड आवाजानें कुमार तिला हांक देई.

" कुमार " ती त्याच प्रेमविव्हलतेनें साद घाली.

" कुमार तुम्ही दोघें मला एकटीला कां टाकतां हो ? " किशोरी रुसून म्हणाली.

" मग तुला एखादा जोडीदार आणून देऊं ? "

" मला नको दुसऱ्यांनीं आणून दिलेला. "

कुमार मोठ्यानें हंसले.

" तूं आहेस नव्या पिढीची. आणि ताई व मी जुनाट माणसें नाहीं का ? "

" मोठा जुनाटपणाचा आव आणला आहांत. रोज पुलावर गप्पा मारीत बसतात जुनीं माणसें ? "

......परीक्षा संपून सुट्टीचे दिवस आले.

" राधे मी लाहोरला जाऊं का ? "

" माझा कंटाळा आला का ? "

" तूं सुट्टींत घरीं जाणार आहेस. तुला माझा कंटाळा आला असेल ? "

" तुम्हीच नेहमीं म्हणतां, संसार स्त्रीचें सर्वस्व असतें. " तिनें निःश्वास टाकला.

"काव्य मला समजत नाहीं पण आपण माझें जीवन आहांत. माझा सुकलेला मळा तुम्ही शिंपला. जीवनाधार ! आपण माझे सारसर्वस्व आहांत. " तिचे डोळे भरून आले.

" तुला चेष्टा नाहीं समजत ? डोळे पूस. मी लाहोरला तुझ्या इच्छे-विरुद्ध जाणार नाहीं. "

"......इथें मला दीडशें मिळतात; पण जन्मभर पुढें सरकण्याची आशा नाहीं. लाहोरला शंभर मिळतील. पण दरवर्षी पंधराप्रमाणें चारशेंपर्यंत चढेन. "

" आपल्याला जें योग्य दिसेल तें करा. मला काय समजतें ह्या बाबतींत. फक्त आपला वियोग मला दुःसह वाटतो. "

" तुला लाहोरला नेतां आली असती तर ? परंतु बाबा वारल्याला नुकतेंच वर्ष झालें आहे. दुसऱ्या वर्षांत लग्न होऊं शकत नाहीं म्हणे. लग्न करण्याची मला फारशी घाई नव्हती तेव्हां. त्यामुळे तुझ्या वडलांना मी तसें सांगून चुकलों आहें. "

राधेनें सुस्कारा मात्र टाकला.

" राधे ! राधे !! तुझ्या मनाचे कढ मला पाहवत नाहींत. मला जगाची फारशी परवा नाहीं. मी उद्यां हरिहररावांना पत्र टाकतों. त्यांनीं परवानगी नाकारली तर आपण लग्न रजिस्टर करूं "

" मी आतां खेद करणार नाहीं. आपण निश्चिंत मनानें लाहोरला जा."

"मी पुरुष आहे. जग माझें काय करणार ? परंतु तुझ्या पितरांविरुद्ध जाऊन तूं माहेराला मुकशील. कधींकाळीं तुला पश्चात्ताप झाला तर ? म्हणूनच मी उगीच ओढाताण करीत नाहीं हृदयांचें मीलन हाच खरा विवाह. ही सर्वोच्च पायरी आपण गांठली आहे. जोंपर्यंत हें उपवन

फुललेलें आहे तोंवर सहवाससुख कांहीं दिवस मागें ठेवायला काय हरकत आहे ?

"कोणतेंही कार्य करतांना माझ्या मनांत विचार येतो, 'राधेला काय वाटेल ?' तुझ्याहि मनांत तोच विचार येत असेल हीच ऐक्याची सीमा........."

".........किशोर, जाण्यापूर्वी मावशीला एकदां भेटून जा बरं का ?"

"तुम्हाला मावशी आहे का ? मला वाटलें तुम्ही एकटेच आहांत."

"मी एकटा होतों ग इथें. मावशीनें मला लहानपणा पासून वाढविलें तिला दोन मुलें आहेत. केव्हां ती त्यांच्याकडे असते; कधीं माझ्याजवळ."

"अस्सें !"

"बरें. मग यायला विसरूं नका हं"

.........परंतु भवितव्यतेच्या रेषा वेगळ्या उमटल्या होत्या. हरिहररावांची तार आल्यानें त्या एकाएकीं घरीं परतल्या. स्टेशनवर कुमार हलकेच राधेला म्हणत होते.

"पत्र पाठव नियमित. मर्यादेच्या खोट्या कल्पनांच्या आहारीं जाऊन माझी उपासमार नको करूं."

अस्वस्थ राधेनें मानेनें समति दर्शविली.

# आकाश कोसळलें

मंडप उभारणें बहुतेक संपलें होतें. घराच्या मुख्य दरवाजावर गेरूच्या पाण्यानें ओबड धोबड गणपति काढला होता व त्याच्या बेंबीवर गूळ सुपारी चिटकवली होती.

घरांत एकीकडे मांडे फेण्या होत होत्या. दुसरीकडे हत्तीलाडू बांधणें चाललें होतें. सगळें घर कामांत गढल्यासारखें दिसत होतें.

ह्या सर्वांचा अर्थ राधा-किशोरीला समजेना. राधेचें हृदय आधींच हुर-हुरत होतें. ही तयारी पाहून आपल्या बलिदानासाठीं हा यज्ञ आहे असें तिला वाटूं लागलें.

किशोरीला सुद्धां सगळें चमत्कारिक वाटलें. घरांत पाहुणे येऊं लागले होते.

" आई, काय आहे प्रकार हा ? "

" काय करायचें आहे तुला ? "

" ह्याचा अर्थ काय ? पाहुणे जमले आहेत ते गप्प का बसले आहेत सारे ? मला तूं कुकुबाळ तर समजत नाहींस ? "

" तुला नुसत्या उठाठेवी फार ! शिकून आईबापांचा अपमान करावा हे तर नाहीं ना सांगितलं तुझ्या पुस्तकांत ?

" पण आई, तुम्ही राक्षसासारखीं वागूं लागलांत म्हणजे काय करावं माणसानं ? "

" खाईत पडणार होत्या—त्या वांचवल्या, तें कुठेंच गेलं. ज्याचं करावं बरं तो म्हणणार माझंच खरं ! "

" काय ? काय म्हणालीस तूं ? कसली खाई ? तूं कुमारांबद्दल बोलते आहेस ? काय केला अपराध त्यांनीं ? "

" तुला काय त्याची पंचाइत ? आईपेक्षां तुला इतरांचं प्रेम ज्यास्त. म्हणतात ना; आमचा जीव तुमच्यापाशीं अन् तुमचा जीव गांवच्या लोकांपाशीं. नेहमीं विस्तव पदरांत घ्यायची तयारीच तुझी. "

" मला हें अर्धवट नको सांगूस. तुझा स्वभाव फार संशयी आहे. तुम्ही कोणाबद्दल काय ऐकाल आणि काय कराल त्याचा नेम नाहीं. ताईच्या इच्छेविरुद्ध तिचें लग्न मी तुम्हांला करूं देणार नाहीं. "

" हें सगळें दिसत होतें म्हणून तर इकडे तारेनें बोलावल्या तुम्हांला. तुझ्या हातात कोलीत द्यावं कुणी ? "

" तूं मला सरळ काय तें सांगणार आहेस का नाहीं ? "

" माझ्याशीं भांडण करून तुझें काम होणार असेल ? "

किशोरी उठून हरिहररावांकडे गेली.

कुमारनें त्यांना फसवलें होतें. ती मंडळी गेल्या तीन पिढ्या संयुक्त प्रांतांत होती. त्यांनीं तिकडच्या एकदोन मुली केल्या होत्या. म्हणजे कुमारची जात निराळी झाली होती. शिवाय कुमारच्या आईविरुद्ध पुष्कळ आक्षेप होते.

ही सर्व माहिती ऐकून किशोरी फार खवळली.

" बाबा हें लग्न होणें अशक्य आहे. "

" उद्यां संध्याकाळपर्यंत तें झाल्याचें तुम्हांला दिसून येईल. "

" पण तुम्ही इतक्या घाईनें दुसरें लग्न कां ठरवलें ? " हताशपणें किशोरी म्हणाली.

" लग्न ठरणें व नंतर मोडणें ह्या गोष्टी मुलीला कमीपणा आणतात. चार लोकांत नाचक्की होते आणि फिरून लग्न जमणें कठीण जातें. "

" फायदा काय ? तुम्ही दोन जिवांचा सत्यनाश करीत आहांत. तुम्हांला पोटच्या पोरांची दया नाहीं. कसलीं चांडाळ माणसें तुम्हीं ? " किशोरी तळतळून म्हणाली.

" तुझ्या कल्पना चुकीच्या आहेत. राधेच्या सुखाच्या दृष्टीनें हें लग्न ज्यास्त यशस्वी होईल. आम्ही राधेचे शत्रु नाहीं. ती तुझी सावत्र बहीण तर माझी मुलगी आहे. कुमारांशीं लग्न करणें म्हणजे प्रचलित समाजनियमांना ठोकर मारणें आहे. तुझी गोष्ट निराळी. पण इतर सामान्य माणसांना हा धक्का सोसत नाहीं. "

" राधा कुमारवांचून जगणें अशक्य आहे. तिनें आत्महत्या केली तर—त्याचें पाप तुमच्या डोक्यावर."

" मनुष्यस्वभाव मलाही थोडा समजतो. चार दिवस रडेल, जिवाला त्रास करून घेईल. दोन दिवसांनीं संसारांत रमली म्हणजे कुमाराला विसरून जाईल. ही जगाची रहाटीच आहे. "

किशोरीनें दांतओंठ खाल्ले.

" जगाची रहाटी ! सारें जग—सारा समाज धुळीला मिळवावा असें वाटतें मला. "

" तुझें रक्त फार सळसळतें आहे. राधेला उद्यां दोन मुलें होऊन ती सुखांत नांदायला लागली म्हणजे तुलाही वाटेल झालें तेंच बरें झालें ! "

" आणि कुमाराबरोबर विवाहबद्ध होऊन सुखांत नाहीं नांदणार ? "

" ज्या मनुष्यानें महत्वाच्या गोष्टी लपविण्याचा प्रयत्न केला त्याची नियत चांगली असेल कशावरून ? "

.......राधा ? ती नुसती रडत होती. तिच्या डोळ्याचे अश्रू क्षणमात्रही खळले नाहींत. तिच्या ह्या लतिकावृत्तीनें किशोरी खवळून गेली.

" ताई, हातपाय हलव. भोंवतालीं घट्ट होत चाललेले पाश तोडून टाक. नाहींतर जन्मभर बंदीवान् होशील. ह्या प्रयत्नांत मेलीस तर सोनें होईल. पण मागून वेश्येचें जिणें कंठायला जगूं नकोस. "

" काय करूं ग मी तरी ! " राधा अशरणतेनें म्हणाली.

" रड ! रड ! ! अशीच रड. म्हणजे होईल कांहीं ! अंगांत कांहीं तेज असेल तर उठून वाट फुटेल तिकडे चालती हो. कुमारांच्या प्रेमाचा आधार तुला आहे. खऱ्या विश्वासांत जाशील तर देव खास तुझी पाठ राखोल. "

......एवढें तेज राधेंत नव्हतें. त्यामुळें तेवढ्या घोर संकटांत किशोरी दुरावली. तिला राधा प्रेतासारखी वाटूं लागली.

" माणसाचें मन जगतें देह नाहीं. "

राधेवर आकाश कोसळत होतें, तेथें किशोरीचें दोन तांबे पाणी ज्यास्त नव्हतें. अखेरचा उपाय म्हणून किशोरीनें कुमारला तार दिली.

सगळे प्रकार वऱ्हाडाच्या दृष्टीसमोरच चालले होते. प्रत्येकजण आपापल्यापरी टीकाटिप्पणी करीत होता. हें सगळें रामायण—नव्हे महारामायण ज्याह्यांच्या घरींसुद्धां पोंचलें.

लग्नांत भांडणांना काय तोटा ? सगुणाबाई तोंडाळ, विहीणींना व्रण सांपडलेला आणि किशोरी राधेसकट सर्वांच्यावर संतापलेली. राधा अजूनही रडत होती. लग्नाच्या दुसरे दिवशीं मांडवपरतणी झाली. मुलीला पाठराखणी धाडायला कोणी नाहीं म्हणून राधा एकटीच गेली.

राधेला माहेर अंतरलें सगुणाबाईंना तिचें प्रेम कधीं नव्हतेंच. किशोरीची व राधेची कायमची ताटातूट झाली. हरिहररावांची अब्रू मात्र निष्कलंक राहिली व सगुणाबाईंना समाधान लाभलें.

× × ×

राधेचे यजमान निळकंठ. बी ए. च्या वर्गात असतांना रेलवेची चांगली नोकरी त्याना मिळाली. व शिक्षणाला त्यांनीं रामराम ठोकला. स्टेशन मास्तर म्हणून त्यांना सध्यां शंभर मिळत होते. शिवाय रेलवेंतील ' च्याऊम्याऊ '.

घरांत मंडळी पुष्कळ होती. राधा सर्वांत वडील सून. खालच्या तीन

नणंदा लग्न होऊन सासरीं गेल्या होत्या. त्यांच्यापेक्षां लहान तीन दीर व एक नणंद.

किशोरीच्या प्रयत्नानें स्वयंपाक घरांतून माजघरांत आलेली राधा दैवाच्या एका फटकाऱ्यानें परत तेथें फेंकली गेली. घरकाम तिच्या परिचयाचें होतें. शिवाय तिच्या खिन्न मनाला कांहींतरी उद्योग औषधासारखा उपयोगी पडला.

राधेच्या कल्पनेप्रमाणें कुमार आतां परपुरुष होता. त्याचा विचार तर काय पण त्याची आठवणदेखील पापांत जमा होती. ' ते हि नो दिवसा गताः ' असें खिन्न मनानें म्हणणें—खालच्या ऊष्ण मैदानांतून हिमाच्छादित गिरिशिखरांकडे पाहणें पाप होतें. पण जनाच्या पापपुण्याच्या कल्पना मनाला मान्य नसतात. त्याच्या कल्पना जगाहून भिन्न असतात. त्यामुळें तिचें हृदय फिरून मागें वळे. तृषार्त अंतःकरणानें तिच्या जीवन पथांत आलेल्या एकच हिरवळीवर तिचे डोळे लागत. परंतु आपण पापी आहोंत ही जाणीव अंतरांतून उमळून येई आणि तिच्या स्मृतींनीं रंगवलेल्या सुंदर चित्रांवर सारवण पडे.

प्रत्येक हिंदु स्त्रीच्या मनोरचनेप्रमाणें राधेला नीळकंठ देव वाटत. लग्नांत हार घालतांना त्याचें मुख प्रथम तिच्या दृष्टीस पडलें. परंतु अश्रूंनीं जडावलेल्या डोळ्यांना तो चेहरा नीट दिसला नाहीं. नंतरही तिला त्यांची भीति वाटे. शिवाय जुन्या मताच्या वडील मंडळीशीं रात्रंदिवस तिचा संबंध. अगोचरपणें मुलींनीं पुढें येणें समाज गर्ह्य समजतो.

राधा मनोमन पतीची पूजा करी. अप्रत्यक्षपणें शक्य ती सर्व सेवा करी. तिच्या सदसद्विवेकबुद्धीचें न ऐकतां अनेकदां तिचें मन बंडाचा झेंडा उभारी. अशा वेळीं तिला फार अस्वस्थ वाटे. कुमारचे विचार तिच्या मनांत ठाण मांडीत, आणि नकळत ती कुमार व नीळकंठाची तुलना करूं लागे. या संग्रामांत बहुधा कुमारच यशस्वी होत.

......सून कितीही चांगली असली तरी सासूगिरी गाजविण्याची इच्छा सासूला होतेच. राधा कामसू, कष्टाळू होती आणि लोण्यासारखी मऊ होती. तिला बोलण्याची संधि सासूला क्वचितच मिळे. परंतु लग्नांत ऐकलेल्या इतिहासावर तिला वारंवार टोमणे मिळत. ती तरी काय करणार ? प्रतिकार करण्याचें सामर्थ्य तिला असतें तर ती या घरांत आलीच नसती. आपण गेल्या जन्मीं कांहीं पाप केलें असेल त्याचें प्रायश्चित्त परमेश्वर देतो आहे असें ती स्वतःचें समाधान करी.

......नीलकंठ सर्वसाधारण मनोवृत्तीचे होते. आयुष्याचा गाडा यदृच्छया जाईल तसा ते जाऊं देत होते—नव्हे—यापलीकडे कांहीं आहे ही जाणीव त्यांना नव्हती. वडिलांनीं पैसे दिले तोंवर ते शिकले, चांगली नोकरी मिळाली, नोकरींत शिरले. घरांतील मंडळींनीं लग्न ठरविलें, ते बोहल्यावर उभे राहिले.

बाहेरच्या जगांत वाहणारे वादळी वारे—त्यांची झळ त्यांना लागली नव्हती. बेकारीच्या सत्रांतून त्यांच्या भाग्यानें ते वांचले, आणि शिक्षण-सत्रांत विचारांच्या मान्यातून सुटले. पत्नी या 'वस्तूं' चा विचार त्यांनीं केला नव्हता—अगर करण्याची जरूर अजून भासली नव्हती.

घरांतल्या माणसांत नवीन पडलेली भर त्यांना कुठेंच 'बोंचली' नाहीं. योग्य समयीं त्यांची व राधेची ओळख झाली. आपण पापी आहोंत ह्या विचारानें राधा दडपून गेलेली होती. आत्मार्पण करून ह्या पापाचें क्षालन करण्याची उत्कंठा तिच्या दुबळ्या मनाला लागली होती. नीलकंठ—त्यांना कशांतच कांहीं वाटलें नाहीं—दीड वर्षानंतर रामचा जन्म झाला. त्याच्या आवाजानें राधेचें मातृहृदय जागलें. तिच्या मनांतील अस्वस्थता दूर पळाली. जग तिला विसरलें होतें. तीहि जगाला विसरली व आपल्या बाळांत विसरून गेली.

कुमारचे 'पापी' विचार तिच्या हृदयांतून आपोआप निवाले. नीळकंठाबद्दल तिला आतांपावेतों भक्ति व आदर होतीं त्यांचें रूपांतर आपलेपणांत होऊं लागलें.

तिच्या आयुष्यांत उत्कटता नव्हती. पण आनंद, शांत आनंद होता. तिची ही रम्य समाधि भंगू नये म्हणून भोंवतालच्या निसर्गानें-सुद्धां घुंगुरवाळा वाजवणें जणुं सोडलें होतें.

तिच्या आयुष्याचें उच्चतम सुख तिला लाभलें होतें—

'पापा, एक गोल पापा. आंखी एकच पापा दे्ले!'

# उन्माद

राधा थकून अंथरुणावर पडली होती. अतिश्रमानें व अंतरीच्या खळबळींनें तिला झोंप येईना. भूकंपाच्या धक्क्यानें जुन्या कल्पनांची मंदिरें पार ढांसळलीं. समुद्राच्या प्रचंड लाटेनें एका सपाटयांत तिचें सौख्याशिखर वाहून नेलें.

गेलीं अडीच वर्षे ती कुमारला विसरण्याचा प्रयत्न करीत होती. रामाच्या जन्मानंतर 'पापी' कल्पनाविरुद्ध उभारलेले किल्ले अजिंक्य झाल्याची शाश्वति तिला वाटूं लागली होती; पण ते सगळे वाळूंचे ठरले. आणि पायाला जरा धक्का लागतांच भराभरा खालीं कोसळले. आतां आत्मसंरक्षणार्थ तिच्याजवळ एकच हत्यार—तेजस्वी शस्त्र उरलें. राम, तिच्या जीवनलतेवर फुललेलें तें मुग्धमधुर फूल, तिच्या कुशींत निजलेला तिचा लाडका बाळ—त्याचा स्पर्श तिला बजावून सांगत होता.

"परपुरुष विचारानें मन भ्रष्ट करूं नकोस."

हा संग्राम तिच्या मनाला असह्य झाला. ती दुसऱ्या कुशीवर वळली. तिच्या मनांतले विचार बळावूं लागले. 'कुमार माझे असते तर!'

जुन्या आठवणीचे बुजवून टाकलेले झरे फिरून पाझरूं लागले. तिचें तृषार्त हृदय त्यांत लहान मुलाच्या निर्व्याजतेनें खेळत होतें.

नीळकंठांनीं तिची अवहेलना कधीं केली नव्हती; पण तिला आपल्या हृदयांतही स्थान दिलें नव्हतें. रामाच्या जन्मानंतर त्यांना ती जास्त जवळची वाटूं लागली, तरी कुमारची कोमलता, आदर, आपलेपणा व

प्रेम, हीं त्यांत नव्हतीं. तिच्या दर्शनासाठीं त्यांचा जीव तळमळत नसे. घरांतील मंडळी तिला कशी वागवतात, ह्याची चौकशी करण्याची आवश्यकता त्याना वाटली नाहीं. तिच्या डोळयांत प्रसंगीं उभवणाऱ्या अश्रूंकडे त्यांचें लक्ष गेलें नाहीं; आणि गेलें असलें तर त्यांनीं तसें कधीं दाखवलें नाहीं.

" चालायचेंच हें ! " त्यांना वाटे " आईचें व तिचें नसेल जमलें कुठें ! दोन भांडीं एकत्र झालीं म्हणजे लागतातच. आणि तीं लागलीं म्हणजे नाद निघावयाचाच. थोड्या थोड्या गोष्टींत लक्ष घालून वाभाडे काढण्यांत काय अर्थ ? चार दिवसांनीं आईची सत्ता कमी होईल. बायकोचें व्यवहारज्ञान वाढेल. आईचें काय ? दहा गेले पांच राहिले. तिला कां दुखवावी ? शिवाय तीही निरुपयोगी—अडगळ नाहीं. घरांत दुखणी आहेत, बाळंतपणें आहेत—अशा वेळीं मोलाचीं माणसें कामीं येत नाहीत. "

" पोरवय आहे अजून. कादंबऱ्या वाचून तरुण मंडळी प्रेमकल्पना बनवतात. ते विद्यालयात असतां एक युरेशियन मुलगी त्यांना फार आवडत असे. आपलें तिच्यावर प्रेम आहे अशी तेव्हां त्यांची कल्पना होती. त्यामुळें ते कुमारला तेव्हांच विसरले.

राधा भित्री होती. जगाविरुद्ध शब्द उच्चारण्याचें धैर्य तिला नव्हतें. तिचें हृदय मात्र वीणेच्या तारेप्रमाणें कंपन पाऊं लागलें.

" दिधलें दुःख परानें उसनें फेडूं नयेचि सोसावें ! "

हें तिच्या आयुष्याचें सार होतें. तथापि तिच्या मनाला कांटखडे बोचतच. थपडेला थपडेनें उत्तर दिलें तर मनांतील मळमळ निघून जाते व मागून बोच उरत नाहीं. राधा असहाय निःशस्त्र होती. सृष्टींत धामधुमींत अशा जिवांचा चक्काचूर होतो; पण दयामय मानवी संस्कृति त्यांना जगवते कशाला ?

राधेची ही अंतःप्रवृत्ति नीलकंठांना समजती तर, तिच्या भावना-प्रधान अंतःकरणाला वांव मिळाला असता.

भावनाप्रवणता पाण्यासारखी असते. ती वाहते तोंवर स्वच्छ शुद्ध व जीवनदायी. तेंच पाणी कोंडून घाला; लागलीच सडूं लागेल. नीलकंठ जगाशीं समरस झाले होते; आत्मपरीक्षण करायला त्यांना एकांत मिळत नसे. सगळीकडे त्यांच्या रोजच्या आयुष्यांतले विचार त्यांचा पाठपुरावा करीत. त्यांना 'तत्त्वज्ञानाची' आवड नव्हती. 'जीवनाचें कोडें' सोडविण्याच्या क्षुद्र प्रश्नानें त्यांना जाचलें नाहीं. म्हणूनच राधा त्यांना उमगली नाहीं.

राधेलाही पायाखालचा रस्ता माहीत नव्हता. तिचा सारा प्रवास डोळे मिटून चालला होता. कुमारनें अचानक येऊन ही आंधळी कोशिंबीर थांबवली नसती तर, हरिहररावांच्या भाकिताप्रमाणें तिचा संसार सुखाचा झाला असता.

सुरुंग विस्तवावांचून जळत नाहीं. राधेच्या आयुष्याला सुरुंग व वात आधींच लागली होती. आणि स्फोट होण्यापूर्वी वात जळून आंतल्या दारूला ठिणगी पोंचवीत होती.

राम मध्येंच कुरकुरला. राधा जरा शुद्धीवर आली. धुंद माणसाच्या तोंडावर पाणी शिंपलें म्हणजे असेंच होतें. तिनें उठून त्याला पदरा-खालीं घेतला.

......तिनें त्याला छातीशी घट्ट धरिलें. ती त्याचे मुके घेत होती. राम गाढ झोंपेंत होता. आपल्या आईवर केवढी आपत्ति येऊं पहात आहे, ह्याची जाणीव त्याच्या कोवळ्या जीवाला नव्हती.

राधेच्या डोळ्यांतून पाणी गळूं लागलें. तिनें रामाला हळूंच खालीं निजवला; व फिरून त्याच्या ओंठांचें चुंबन घेतलें......ती किती वेळ अंथरुणावर बसली होती.

तिला उन्माद चढत होता. आपलें डोकें ताळ्यावर नाहीं, असें

तिचें तिलाच वाटलें. ' कुमारचे विचार दूर ठेवलेच पाहिजेत '—तिनें निश्चयाने मनाला सांगितलें.

प्रवाहांतून होडी परतवतांना नीट वल्हवली नाहीं तर ती उलटते. राधेनें निश्चयानें मन आंवरण्याचा प्रयत्न केला. त्याचा परिणाम उलटा झाला. तिनें धाडकन् बिछान्यावर अंग टाकलें. तिला हुंदक्यावर हुंदके येऊं लागले. तिचें मन पुनःपुन्हां म्हणत होतें.

" कुमार ! हाय कुमार ! मी किती पापिणी—अभागी ! तुमच्या जन्माचा सत्यानाश केला. "....

..." काय माझ्या जगण्याचा उपयोग ? "...तिनें जीव देण्याचा निश्चय केला. ती अंथरुणावरून उठली. तिनें ओचापदर बांधला. मंगळसूत्राखेरीज सर्व अलंकार उशाशीं काढून ठेवले. तिला रामचें विस्मरण पडलें. तो स्वस्थ झोंपला होता. जगानें सर्वोत्तम ठरवलेलें सर्वसुंदर मातृरत्न—त्याला आपण मुकणार,—हें त्याच्या बालमनाला माहीत नव्हतें...नाहींतर...कोण जाणें ! राधेचा जीवनौघ निराळ्या दिशेनें वाहता !

ती उठून बाहेर आली. आकाश मेघांनीं व्याप्त होतें. पावसाची बुरबूर सुरू होती. जीव देण्याचा विचार ती आतांपावेतों विसरली. तिनें दार उघडलें व ती घराबाहेर पडली.

आपल्या कृतीची जाणीव तिला राहिली नाहीं. पाय रस्ता कांपीत होते एवढेंच. थोड्या वेळांत, वेडा बसला होता तेथें ती येऊन पोहोंचली. तो तेथें नव्हता. म्युनिसिपालिटीच्या मंद दिव्यांत दहा पधरा पावलावर एक आकृति जातांना तिला दिसली. कुठली तरी अज्ञात शक्ति तिला पुढें ओढून नेत होती जणूं ! नकळत ती त्या व्यक्तीमागें जाऊं लागली. सरासरी दीड मैल अंतर ती चालली असेल. अंधार वाढल्यानें त्या व्यक्तीला दृष्टिपथांत ठेवण्यासाठीं ती तिच्याजवळ आली.

ती व्यक्ति अकस्मात मागें वळली. वेडाच तो ! त्याला राधा दिसली नाहीं. आपल्या ठराविक पुलावर तो बसला. राधा त्याच्या शेजारीं जाऊन बसली. गेलीं अडीच वर्षे विजेप्रमाणें चमकून अदृश्य झालीं. त्यांचा मागमूसही तिच्या मनावर उरला नाहीं.

" कुमार ! कुमार ! " तिनें त्याच्या खांद्याभोंवतीं हात टाकीत म्हटलें. त्यानें तिच्या खांद्यावर मान टाकली.

......तीं कोठें जात होतीं कोण जाणें ! दोघांचेंही कपडे पावसानें भिजले होते. त्या अधारांतून पाय जिकडे नेतील तेंच त्यांचें इच्छित स्थान. कदाचित् एकाद्या विहिरीनें त्यांचा बळी घेतला असता. एकाद्या जंगली जनावरानें आपली क्षुधा तृप्त केली असती. किंवा तहानभुकेनें व्याकुळ होऊनही त्यांचा अंत झाला असता.

......राधेला एक पिवळा पांढरा तेजस्वी दिवा अंधेरांत दिसला. तिचीं पावलें आपोआप तिकडे वळलीं. पुष्कळ वेळ गेल्यावर दोघेंही रेल्वेच्या रुळाजवळ पोहोंचली. राधा आतां थकून गेली होती. तिच्या पायांत दोन तीन कटेही मोडले होते. ती एका डब्यांत चढली. सारा डबा रिकामा होता. आपला पदर तिनें कुमारच्या कमरेला घट्ट बांधला; व बांकावर त्याला निजविलें.

दुसऱ्या बाकावर तिनें अंग टाकलें. आपण काय केलें ह्याची जाणीव तिला अजून नव्हती. मेल येणार म्हणून बाजूला टाकलेली पॅसिंजर तास भरानें तेथून सुटली राधा व वेडा कुमार स्वस्थ झोंपलें होतीं.

दिवस उजाडला. पूर्वेचीं उन्हें डब्यांत शिरलीं. रात्रीच्या डब्यांत प्रवासी येऊं लागले. राधा अजून गाढ निद्रेंत होती. प्रवासी मात्र त्या जोडीकडे पाहून अचंब्यांत पडत. दाढी व हजामत वाढलेला, गलिच्छ चिंध्या घातलेला माणूस, आणि त्याच्या कमरेला पदर बांधून निजलेली मध्यमवर्गीय युवति ! ह्यांची त्यांना सांगड घालतां येईना.

......राधा उठून बसली. आपण स्वप्नांत आहोंत असें प्रथम तिला

वाटलें म्हणून तिनें परत डोळे मिटून घेतले. परंतु तिची विचारप्रणाली आतां जागृत झाली होती. रामाला पुष्कळ वेळांत न पाजल्यानें तिचे स्तन जड झाले होते. तिनें पुन्हां डोळे उघडले. हें दुष्ट स्वप्न विरून, आपला लाडका राम आपल्याला दिसेल; असें तिला वाटलें होतें. परंतु डोळे उघडल्यावर तिला पहिलेंच दृश्य दिसलें. हळूहळू तिला रात्रीच्या बहुतेक साऱ्या क्रिया आठवूं लागल्या.

आपण केवढी चूक केली, त्याची जाणीव झाली. तिचा राम तिला अंतरला—कायमचा अंतरला होता. तिला कुमारचा तिटकारा आला. ह्या समस्येतून कशी सुटका व्हावयाची ? तिची बुद्धि संकटावर आपटून बोथट झाली.

रात्री तिला ' सर्वोभूति ' कुमार दिसत होते. आतां ' जलीं स्थलीं ' राम दिसूं लागला. तिच्या भारावलेल्या स्तनांतून दुधाचे कांहीं थेंब खालीं गळले. ती उठली, परंतु कुमारच्या कमरेला बांधलेल्या पदरानें तिला मागें खेंचलें.

' परत जाण्याचा मार्ग आतां बंद झाला आहे. तू सांपळयांत सांपडली आहेस ' असेंच जणूं तिला तो सांगत होता.

त्याच धक्क्यानें वेडा कुमार जागा झाला. शून्य नजरेनें तो कोठेंतरी पहात होता. त्याच्या तोंडांतून करुण हांक बाहेर पडली.

' राधे ! राधे ! '

राधा त्याच्याजवळ बसून स्नेहार्द्रतेनें म्हणाली.

" ' कुमार, मी तुमची राधा—आहे ना इथे ! ओळखत नाहीं तुम्हीं मला ?

# जलांत

जवळ पैसा नाहीं, कुठें जात आहोंत माहिती नाहीं; अशा स्थितींत राधा बसून होती. वेडा कुमार मधून बडबड करी.

" एप्रिल-मे-जून-जुलै...अं ? मे-जून-जुलई..." अशी निरर्थक बडबड असायची त्याची. त्याच्या वस्त्रांना व अंगाला न जाणें किती दिवसांत पाणी नव्हतें; व त्यामुळें खूप घाण येत होती. राधा बधिर मनानें स्वस्थ बसली होती. तिच्याशीं इतर प्रवासी बोलले नाहींत, पण आपसांत मात्र चर्चा करीत होते.

बाराच्या सुमारास एक वृद्ध गृहस्थ गाडींत चढले. त्यांना तिच्याबद्दल कुतुहल वाटलें. ते स्वतः आर्यसमाजी होते व शक्य तोपर्यंत अनाथ स्त्रियांना साह्य करण्याचें त्याचें व्रत होतें.

" बेटी कहां जा रही हो ? "

" जहां भगवान ले जायगा ? " राधेनें उत्तर दिलें. तिनें त्यांना आपला ' इतिहास ' सांगितला. तिची कर्मकथा नव्हती ती. तिच्या दुबळ्या व बधिर मनानें प्रवाशांच्या चर्चेतून ' सूचना ' आत्मसात केल्या होत्या आणि सत्याबरोबर ती त्यांची भेसळ करीत होती.

"...वेडे झाले...घरांतून निघून आले...त्यांचे मित्र होते इकडे एक. मी शोधीत आलें. पोलिस पकडून पागलखान्यांत पाठवणार होते. आम्हीं रातोरात पळून आलों......"

' सामान ? ' राधा दचकली. तिनें डब्यांत सभोंवतीं पाहिलें नंतर कपाळावर हात फिरवीत म्हणाली—

" कोण जाणें काय झालें ! "

" तुमने भविष्यके लिये कुछ निश्चय किया है ? "

तिनें कपाळावरून हात फिरवला.

" हिंदी खूब अच्छी बोलती हो. कुछ पढीलिखी हो ? "

"हां. अंग्रेजी पढ सकती हूँ अच्छी तरहसे. लिखना शायद भूली हूँ."

" मेरे साथ चलोगी ? मै स्कूलमें नौकरी दिलाऊंगा. "

' पिताजी ' वैद्य होते. पुढच्या पांच तासांत त्यानींच कुमार–राधेची काळजी घेतली. कुमाराला औषध देण्याचेंही.

स्टेशन आलें. नांव वाचतांच आपण इटारसी–झांशी ह्याच्यामध्यें कुठें तरी आहोंत—तिला वाटलें. वैद्यबुवांच्या सहाय्यानें कसलाही त्रास न होतां दोघेंही त्यांच्या घरीं पोहोंचलीं.

...दोन दिवसांत कुमारचें रूप पालटलें. त्याचें बाह्यांग पूर्ववत स्वच्छ झालें. त्यांची पूर्वपीठिका जाणण्याचा ' मा'जींनीं पुष्कळ प्रयत्न केला. पण अशा वेळीं राधेच्या डोळ्यांना साहजिक पाणी येई.

राधेला नोकरी लागली. तिच्या शिक्षणाचा आढावा ती देईना. तिच्या अर्जावरून तिला बरेंच येतें, असें कमेटीला वाटल्यानें ती एका शाळेची मुख्याध्यापिका झाली. शाळा हिंदी असून, तिला एकदोन इंग्रजी वर्ग नुकतेच जोडले होते.

राधेचा बराच वेळ शाळेंत जाई. घरींसुद्धां तिला पुष्कळ काम असे. लहान मुलांना वाढवण्याचें काम किचकट व कंटाळवाणें. पण वेड्याची शुश्रूषा करणें त्यांतूनही जिकिरीचें व त्रासदायक. तरी राधा सगळीं कामें हंसत मनानें उरकी.

एका महिन्याचा पगार हातीं आल्यावर राधेनें गांवांत घर पहावें, असें प्रथम ठरलें होतें. पण वैद्यबुवांच्या पत्नीला तिचा स्वभाव फार आवडला व त्यांनीं तिला आपल्या अवाढव्य घरांत दोन खोल्या काय-मच्या रिकाम्या करून दिल्या.

काम, काम सारा दिवस काम ! आणि इतक्या कामानंतर अति-श्रमानें निद्रा—असे राधेचे दिवस चालले होते. क्वचितच तिला बाहेरच्या जगाची झुळुक लागे. वर्गातल्या मुलांशीं बोलतांना तिचें मन भरून येई.

आपला चिमणा कुठें असेल ! आईविना अनाथ मुलाची काय अवस्था होते, ह्याचा अनुभव तिला होता. तिला वाटे पंख लावून जावें व त्याला घट्ट पोटाशीं धरावें.

अनेकदां बाळाचा वियोग असह्य होऊन, तिच्या डोळ्यांना धारा लागत. माजींना वाटे—

" पोरगी पतिचे चिंतेनें कोळपते "

त्या तिची समजूत घालीत.

" वैद्यजींचा हात फार यशस्वी आहे. चिंता करूं नको. परमेश्वरावर भरंवसा ठेव. कर्ताकरविता तो आहे."

राधेचा परमेश्वरावर विश्वास होता. ती नित्य नियमानें रामायण वाचीत असे. तिचा आवाज गोड होता. तिच्याकडून माताजी अनेकदां भक्तियुक्त गाणीं म्हणवून घेत. तिचें मन अशा वेळीं तन्मय होई.

'आपण घरांतून निघून येण्यात पाप केलें' अशी तिची भावना होती. हळूहळू तिची ती कल्पना बदलूं लागली.

'माझ्या सारख्या भित्र्या मुलीला इतकें धैर्य देण्यांत प्रभु रामचंद्राचा खास कांहीं हेतु असेल.'

दुबळीं माणसें आपल्या डोक्यावर कोणताही दोष सहसा घेत नाहींत. कारण आपण अपराधी आहोंत हें समजल्यावर परिणामाचें उत्तरदायित्व घेण्याचें त्यांना धैर्य नसतें. परमेश्वराची काठी त्यांना अशा वेळीं फार उपयोगीं पडते.

रामची आठवण तिला फार येई. तथापि त्याला सोडण्यांत आपण चूक केली नाहीं, असें कालांतरानें तिला वाटूं लागलें.

"कुमार माझ्यामुळें वेडे झाले. त्यांची सुश्रुषा करणें, हें माझें आद्य-कर्तव्य आहे. ते शुद्धिवर आले म्हणजे मी त्यांचा संसार थाटून देईन व मग बाळाकडे जाईन. बाळा, कुमारना माझी जास्त गरज आहे. कुमारच्या प्रेमाचें ऋण सुद्धां मला फेडलें पाहिजे.

माझ्या मनांत पाप नाहीं. कुमार मला भावासारखे आहेत. मला एकादा भाऊ असता, आणि तो वेडा होता, तर नसतें का मी बाळाला सोडून त्याच्याजवळ राहिलें ? "

ह्या विचारांनीं तिच्या मनाला एक तऱ्हेची शांति लाभली. कुमार-राधा पतिपत्नी असल्याचा सर्वांचा समज होता. त्यामुळें तिला अस्वस्थ वाटे. पण सत्यान्वेषण करण्याचें धैर्य तिला नव्हतें.

तिच्या शांततेतूनही मानवी भावना मधून चमकत. क्वचित् तिला कुमाराचा—शाळेचा—नव्हे जिवाचाही वीट येई. ती अशावेळीं दुर्मुखत असे. पण तें तेवढ्या पुरतेंच. पुन्हां ती कामांत गढून जाई. पुन्हां 'कर्तव्याची जाणीव' तिच्या मनाला तीव्रतेनें होई.

" घर सोडण्यांत आपण पाप केलें नाहीं–कुमार आपले भाऊ आहेत--त्यांची शुश्रूषा करणें आपलें कर्तव्य आहे." ह्या विचारप्रणालींतून कांहीं नवीन कल्पना उदय पावल्या.

नीलकंठाबद्दल एक तऱ्हेची समीपता वाटूं लागली. आपलें मन पूर्ण शुद्ध आहे, असा आत्मविश्वास निर्माण झाला. जगांत अर्धी माणसें आत्मवंचनेवरच जगतात. आत्मशोधन करण्याची सत्य पहाण्याची आवड थोड्यांनाच !

आपला मार्ग ठरवण्याची बुद्धि बहुधा कोणालाच नसते. जग जातें त्या रस्त्यानें जायचें. 'पांचामुखीं परमेश्वर !' प्रसंगीं ह्या परमेश्वराचीं पावलें दिसेनाशीं झालीं म्हणजे सामान्य मनुष्य बावरतो व इतर कोठें आधार शोधूं लागतो. आपलें कृत्य परमेश्वराघरीं मान्य होईल, अशी श्रद्धा राधेला वाटूं लागली. आणि परमेश्वराला प्रिय जें पातिव्रत्य त्याची जोपासना ती मनःपूर्वक करी.

सकाळीं नीलकंठांना मनोमन वंदन, तुळशीची पूजा, सोमवार, शिवरात्री वगैरे व्रतें रात्रीं त्यांच्या चिंतनांत झोंप—असें तिचें जीवन वहात होतें.

आपल्याला घरांत कोणी घेणार नाहीं—आपल्या शीलावर जग शिंतोडे उडवील—नव्हे आतांपावेतों आपल्या तोंडाला काळोखी लागली असेल हा विचार कधीं फारसा तिच्या मनांत आला नाहीं.

दिवस भराभर जात होते. दसरा गेला, दिवाळी उजाडली. भाऊ-बिजेला तिनें वेड्या कुमाराला ओवाळलें. ती परमुलुखांत असल्यानें तिचें हें चमत्कारिक वर्तन भोंवतालच्या मंडळींना जाणवत नसे. त्यांना वाटे,

'रीतच अशी ह्या लोकांची !'

हरछट आली. मुलाच्या आईला त्या दिवशीं उपवास.

"बेटी तू भी व्रत ले. आगले साल तेरे लडका हो जायगा." माजी म्हणाल्या. राधेच्या मनांत डोंगर उभे राहिले. तिचा आवाज भरून आला. तिनें अश्रू थांबविण्याचा प्रयत्न केला; पण आणखी क्षण-भरांत बांध फुटून सर्व प्रदेश जलमय झाला.

कुमारच्या प्रकृतींत हळूंहळूं सुधारणा होत होती. त्याच्या हातापायाचे चाळे पुष्कळ कमी झाले. त्यांची बडबड कमी झाली व शून्यवृत्तीही ओसरूं लागली. राधेकडे तो अनेकदां टक लावून पाही, पण ओळख मात्र पटत नसे.

—त्याला ताप आला. कसला असावा समजेना. आला तो एकदम एकशें सहावर चढला, आणि कुमार बेशुद्ध झाला. पण बडबड न करितां तो ग्लानींत पडून राही. दूध व औषध तोंडांत घातलें तर ध्यावें व पडून रहावें. त्यानें आठवड्यांत एकदांही डोळे उघडले नाहींत, राधा घाबरून गेली, 'काय होईल आतां ? आपण कुमारला मुकणार ? इतके दिव-सांची सेवा व्यर्थ जाणार ?"

ती मनाला धीर देत होती व परमेश्वराचा धांवा करीत होती. वैद्य-जींनीं तिला सत्य सांगितलें.

" बेटी, हा ह्या दुखण्यांतून उठणें कठीण आहे. पण जगलाच तर तुझ्या सौभाग्यानें ह्याचें वेड जाईल."

राधेनें हंबरडा फोडला.

...कुमार आपल्याला किती प्रिय आहे, ह्याची तिला कल्पना येऊं लागली.

" देवा, कुमारांच्या मागें मला ठेऊं नकोस. माझ्या जिवाच्या पुष्कळ आपदा झाल्या. माझेही डोळे त्यांच्याबरोबर मिटूं दे. माझें काळें तोंड घेऊन मी कुठें जाऊं ?"

आणखी एकाद्या दिवसांत, कुमार तिला काय तें उत्तर देणार होता. कुमार जगल्यास त्याच्या सेवाशुश्रूषेंत महिने खर्च होतील. नाहींतर.... समोर सगळा काळोख होता.

इथें रहाणें हेतुहीन होतें.

" शून्य दिशा, शून्य मनें...भारभूत जिणें " इथेंच कंठायचें अगर रामाकडे परतावयाचें. कुमारचा संसार थाटून आपण आपल्या नंदनव-नांत जाऊं, अशी तिची आपल्या मनाला शिकवण होती. पण ती वेळा इतकी जवळ आल्यावर, तिला मार्गावर पर्वत उभे दिसूं लागले.

आपल्याला घरांत घेतील का ? मी बाळाला इतके दिवस टाकून गेलें. माझी माया त्याला वाटेल का ? माझ्या शब्दावर विश्वास ठेवील का कोणी ? काय व्हायचें माझें पुढें ?

तिला एक सत्य विशेषेंकरून बोंचत होतें —

कुमार आपले केवळ भाऊ नाहींत भावापेक्षां ते आपल्याला किती तरी जवळ आहेत. त्यांच्या प्रेमाला तुलना एकट्या बाळाची आहे—नव्हे मातृहृदयापेक्षां सुद्धां आणखी कांहीं भाव आपल्या हृदयांत जागले आहेत ही जाणीव तिला होत होती.

# ओढ

शोधुं कुठें आधार ? वाहे अश्रूंची धारा ॥
हा रेत हळू, लागे निसरूं
स्थिर चरण न भूला
वाहे......।
निबिड काननीं, वृक्षलतांनीं
मार्ग प्रभो चुकला
वाहे......।
कृष्ण तमिस्रा, व्यापि दश दिशा
चमके एक न तारा
वाहे......।
धडधडतें उरिं, वृत्ति बावरी
करिसी उशिर दयाळा
वाहे......।

सायंकाळची वेळ. नोव्हेंबरचे दिवस असल्यानें थंड वारा वाहूं लागला होता. कुमारना झोंप लागली होती. राधा तुळशीवृंदावनाशीं धूपदीप करून क्षणभर टेंकली होती. तिच्या हृदयांतली खळबळ तिच्या आवाजांत प्रतिबिंबित झाली होती.

बऱ्याच वेळानें ती जड मनानें उठली आणि घरांत गेली. विजेचा निळा ' फुगा ' अंधुक प्रकाश देत होता. त्या शांत प्रकाशांत तिच्या

मनाची खिन्नता द्विगुणित झाली. बाहेरच्या थंड हवेंत तिला हुडहुडी भरली होती, त्याची जाणीव तिला घरांत आल्यावर झाली. खोलीच्या कोपऱ्यांत शेगडी जळत होती. तिच्याजवळ ती हात शेकायला गेली.

पाऊल न वाजवतां ती कुमारच्या अंथरुणाजवळ गेली. कुमार डोळे उघडून छताकडे पहात पडले होते. तिची चाहूल जणुं त्यांनी ओळखली.

" राधाराणी पाणी दे "

त्यांचा आवाज शांत व स्नेहपूर्ण होता. त्यांतील शून्यता, भकासपणा हीं विलयाला गेलीं होतीं. ' राधाराणी ' याच नांवानें ते तिला पूर्वी अनेकदां संबोधीत.

राधेचें मन आनंदानें भरून आलें. त्यांच्या कपाळावर हात फिरवीत म्हणाली,

" फार थंड झालें आहे पाणी. कढत करून आणतें हं जरा. "

पाणी पिण्यासाठीं उठून बसण्याचा कुमारनें प्रयत्न केला.

" कुमार हलूं नका तुम्हीं. " त्यांना शक्ति नव्हतीच.

" मला काय झालें आहे 'जीवन' ? "

" तुम्ही फार आजारी आहांत. "

" असें ! " ते विचार करीत म्हणाले.

" राणी माझ्याजवळ बस जरा. " ती खालीं बसली. तिचा हात त्यांनीं आपल्या रुक्ष हातांत घेतला.

" राणी, मला मोठें चमत्कारिक स्वप्न पडलें. "

" निजा बरं आतां तुम्ही ! नाहीं तर फिरून आजारी व्हाल. "

" जीवन, मला वाटलें तूं मला कायमची सोडून गेलीस. पण—पण तें स्वप्न आहे नाहीं ग ! बघ तुझा हात माझ्या हातांत आहे ना ? "

राधेनें स्नेहभरानें त्यांच्या मस्तकाचें चुंबन घेतलें. कपाळावर आपला हात ठेवीत ती म्हणाली,

" आतां उद्यां बोलूं बरं का आपण ! डॉक्टर म्हणतील, 'ही कसली शिकलेली बाई ! शुश्रूषा देखील नाहीं करतां येत हिला' ! "

कुमार हंसले. पण तंद्रींतच. मेंदूला थोडासा ताण दिल्यामुळें त्यांचे डोळे मिटूं लागले होते.

ही शुभवार्ता राधेनें लागलीच वैद्यजींना कळविली.

" आज तो जागना पडेगा, " ते म्हणाले. " फार थकून गेला आहे पोरगा. रात्रीं अपरात्रीं जागा होईल तेव्हां तेव्हां दूध दे. चमचा-चमचा घेतलें तरी हरकत नाहीं. "

राधेनें आपली खाट कुमारच्या पलीकडे आणून घातली व तिनें पाठ टेकली.

परमेश्वरानें आपली हांक ऐकली म्हणून तिनें त्याला सहस्रावधि धन्यवाद दिले. गेल्या दोन दिवसांत तिचे हातपाय अगदीं गळले होते. आतां तिच्या मनाला धीर आला.

.........कुमार सुधरूं लागले; पण शक्तीबरोबर त्यांची जिज्ञासा जागृत होऊं लागली. राधेशिवाय भोंवतालचें सगळें वातावरण नवें वाटे. राधेनें शाळेंतून सुट्टी घेतली असल्यानें तेवढा प्रश्न मात्र सुचला नाहीं त्यांना.

राधेच्या विवाहाच्या वार्तेने वेडे झालेले कुमार—त्यांना अंतःप्रवाह समजले नाहींत तरी ते प्रवाह नष्ट झाले नव्हते. नव्हे राधेच्या सहवासानें सारी भूमि फुलांनीं फुलली व त्यांचा गंध दरवळूं लागला होता.

" राध, मला झोंप येत नाहीं. "

" मी जवळ बसतें. "

राधा त्यांच्याजवळ बसली. बऱ्याच वेळानें कुमारांनीं डोळे उघडले.

" राणी, मला अजूनही झोंप नाहीं येत. "

" थोपटूं का मी तुम्हाला ? "

" तूं माझ्याजवळ निज. " राधेला धक्का बसला.

" कुमार तुम्हांला वेड का लागलें आहे ?"

" वेड कसलें त्यांत जीवन ? माझ्या मनावरची स्वप्नाची पकड अजून कमी होत नाहीं. तूं उठशील, दूर जाशील, आणि—आणि"

कुमारचें अंग शहारलें. "मला अंतरशील असें सारखें वाटतें मला."

" पण लोक काय म्हणतील कुमार ?"

" जीवन, माझ्या अंगावर हात ठेवून निजशील तर माझ्या प्रकृतीवर कांहीं परिणाम होणार नाहीं."

" मी माझी खाट तुमच्या पलंगाजवळ आणतें."

कुमार बोलले नाहींत. परंतु अशक्त मनाला कांहीं सोसत नसल्यानें त्यांचे डोळे भरून आले. आणि अश्रू गालांवर ओघळले.

घर, दार, फार काय पुत्राचा त्याग करून आपण आलों, आणि...

तिनें कुमारांचे डोळे पदरानें पुसले व त्यांचें मस्तक छातीवर घेतलें.

" निजा आतां स्वस्थ. मी इथें आहे ना ?"

कुमारांना तेव्हांच झोप लागली. राधा विचार करीत पडली होती. कुमारच्या श्वासानें तिच्या अंगावर रोमांच उठले. त्यांच्या स्पर्शानें तिच्या शरीरांतून एक विद्युत्प्रवाह निघून गेला. कांहीं वेळ तिची देहलता कांपत होती. या सर्व चिन्हांचा अर्थ न समजण्याइतकी राधा खुळी नव्हती. कुमारकडे आपण आलों तें कर्तव्य पूर्ण करण्यासाठीं, ही भावना कुमारनें मृत्यूच्या दारांत पाय ठेवतांच उडून गेली. राधेला आपलें मन आरशाप्रमाणें स्पष्ट समजलें होतें.

आपला आणखी किती अधःपात होणार ? बाहेरचे शत्रु असतील तर नाकेबंदी करतां येते आणि आंतलेच असले तर ?

परमेश्वरा माझ्या हांकेला पावलास. कुमारांच्या प्राणांची भिक्षा मला घातलीस. देवा, माझ्या दुबळ्या मनापासून माझ्या सत्त्वाचें रक्षण करा."

कुमारचें अस्तित्व, कुमारची समीपता विसरून जाण्याचा ती प्रयत्न

करीत होती. पण तिचे ज्ञानतंतु जागले होते. चिरवांछित स्पर्श त्यांना मिळाला होता.

नीलकंठ—कुमार ! नीलकंठाशीं गेलीं अडीच वर्षे ती गृहिणी-पत्नी या नात्यानें वागत आली होती. कुमार–कुमारनें निसर्गसुलभ भाव तिच्यांत प्रथम निर्माण केले होते. तिच्या संस्कारक्षम मनाला दोघेही प्रिय होते. पण जगाचे कृत्रिम बंध न समजणाऱ्या हृदयाला कुमार 'प्रियकर' म्हणून प्रिय होते. नीलकंठ तिचें आराध्य दैवत होतें.

ह्या संग्रामांत छोट्या बाळाची मदत तिच्या विरुद्ध बाजूला होती. अखेर बाळचाच जय झाला. निद्रिस्त कुमाराचें मस्तक राधेनें हलकेच उशीवर ठेवलें, आणि आपल्या बिछान्यावर जाऊन पडली. ताणलेल्या तारा सैल झाल्या, तिच्या नेत्रांतून अश्रु वाहूं लागले.

तिनें निश्चय केला.

"मी पापी मनाला वाव देणार नाहीं. कुमार मला कितीहि प्रिय असले तरी ते परपुरुष आहेत. परपुरुष स्पर्शानें आर्यस्त्रीच्या शीलाचें भस्म होतें...मी पवित्र राहिलें का मग ? नाहीं !......अजून अवकाश आहे. माझ्या पापी मनाचें मी नियंत्रण करीन. मी रामची आई आहे. स्वतःची जबाबदारी विसरण्याचा मला काय हक्क ?

कुमार माझे भाऊ आहेत. नव्हे–भावाशिवाय इतर कोणचेंही नातें आमच्यांत शक्य नाहीं. या नात्याला लांछनास्पद वर्तन मी करणार नाहीं.

तिच्या निश्चयानें तिला फार समाधान वाटलें व ती झोंपी गेली.

तिनें निश्चय केला खरा पण तो तडीला नेणें तितकें सोपें नव्हतें. कुमारच्या मर्जीविरुद्ध जाणें तिला जमत नसे. त्यांच्या प्रकृतीच्या दृष्टीनें तें फारसें इष्ट नव्हतें. तथापि वैद्यजींच्या नांवानें ती पुष्कळशी दूर राही.

कुमार हिंडूं फिरूं लागले.

"राधे, आपण येथें कशी आलों ? तुझ्या अंगावर कसें कांहीं नाहीं ? तूं शाळेला कां जाऊं लागलीस ? हे वैद्यजी कोण ?"

राधेचे डोळे ओलावले.

" कुमार, ती फार लांब आणि कटु कहाणी आहे. तुम्ही चांगले व्हा. तुम्हांला नाहीं तर कोणाला सांगूं मी आपलें दुःख ? "

कुमार तिच्या खिन्न मुखाकडे क्षणभर पहात राहिले व नंतर तिला आपल्या बाहुपाशांत ओढून म्हणाले,

" जीवन, तुझ्या डोळ्यांत पाणी आणलें मी ? राणी, तुझ्या सुखा-इतकी मला कसली पर्वा आहे ? मी आतां बरा झालों. मला काय तें स्पष्ट सांग. "

" इतके कष्ट व विपदा सोसून तुमची शुश्रूषा मी केली. माझी तपस्या व्यर्थ जावी अशी मला यत्किंचितही इच्छा नाहीं. कुमार, राधा तुम्हांला प्रिय आहे ना ? राधेच्याच गळ्याची शपथ. तुम्हीं मला कांहीं विचारूं नका. "

कुमारांनीं तिची शाळा थांबवली. त्यांनीं आपल्या गुमास्त्याला पत्र टाकून पैसे मागवून घेतले.

केव्हांतरी गौप्य स्फोट करणें अवश्य आहे हें राधा जाणून होती. कुमार जसजसे बरे होत चालले तशी तिला बाळाची ओढ लागूं लागली. कुमाराच्या शुश्रूषेचें कामही कमी होत होतें. त्यामुळें तिला रिकामा वेळ पुष्कळ सांपडे. ती झुरणीस लागली. कुमाराचा सहवास प्रिय असूनही मोकळ्या मनानें त्याचा आस्वाद तिला घेता येईना. खुल्या मैदानावर जीव गुदमरत होता तिचा हवेसाठीं !

" बेटी तू तो बडी दुबली हो रही है. "

" माँ, मैं सालोंसे पीहर नहीं गई. इनकी तबियत ठीक होती जा रही है वैसा मेरा जी उधर खिंचा जा रहा है "

# जिज्ञासा

राधेनें तोंडाला कुलुप घातलें तरी चोरी व्हावयाची ती झालीच. वेडाची दोन वर्षे सोडून, बहुतेक सारे धागेदोरे कुमारला सांपडले. आपण राधेसह गाडीच्या डब्यांत कसे आलों, हें मात्र त्यांना अजून उलगडत नव्हतें.

वस्तुस्थिति दिसते तशी नाहीं; आपल्या या सुखी आयुष्याची वाटेल तेव्हां धुळधाण उडूं शकेल, ही जाणीव त्यांच्या मनांत उत्पन्न झाली. समोरून येणाऱ्या संकटाला मनुष्य धैर्यानें तोंड देतो. मागून अचानकपणें मान पकडणारी विपत्ति त्याचा नाश करिते.

" राधा आपली नाहीं. ती आपल्यापाशीं आली हें गूढ आहे. तिला आपण प्रिय आहोंत, तरीही आपल्या स्पर्शानें ती मागें सरते," हें त्यांच्या लक्षांत आलें. कुमार स्वतःच मागें राहूं लागले.

स्वस्थ बसणें हा त्यांचा स्वभाव नव्हता. इतिहास त्यांचा आवडता विषय व सभोंवती राजपूतकालीन अवशेष विपुल. कुमार अशा अवशेषाची माहिती गोळा करूं लागले. राधेशीं त्यांचें वर्तन प्रेमळ असे, पण प्रणयिनीचें समाधान शांत प्रेमानें होत नाहीं. प्रणय उच्छृंखलतेची एक रम्य व मोहक छटा आहे. लाटेवर लाट आदळते. दोन्हींतून तुषार वर उसळून रंगाची आरास होते. ह्या सुषमेसाठीं प्रणयी मन झुरत असतें.

राधेचा घराचा ध्यास वाढला. " कुमारांना काय आवश्यकता आहे

आपली आतां ? आपल्या ध्यासानें वेडे होणारे कुमार आपल्याला विसरले तर ? " ती मनाला म्हणे. तिला त्यांचा प्रेमळ परकेपणा असह्य होई. त्यापेक्षां......पण कोणी सांगावें ? ' असें असतें तर ? ' हा प्रश्न मानवी हृदय असंतुष्टपणें नेहमींच करितें. पण......

संध्याकाळीं एक जुना शिलालेख पाहून कुमार घरीं परतले. राधा तुळशीपुढें बसून अश्रू गाळीत होती. कुमारना आत्मसंयम राहिला नाहीं. त्यांनीं तिला पुढें ओढली.

" राणी फुलं कां ग कोमलीं ? "

तिनें असहायतेनें त्यांच्या खांद्यावर मान विसावली.

" डोळयांच्या पाण्यानं कां हंसतील ती ? " राधा मुसमुसून रडत होती. बराच वेळानें कुमार म्हणाले,

" जीवन, ऊठ. मी जवळ असतांना अश्रू कशाला हे ? प्रेमाचीं माणसें निघून गेल्यावर त्यांच्या समाधि पूजायच्या असतात त्यांनीं. "

राधेचे कमी झालेले अश्रू जोरानें वाहूं लागले. ती स्फुंदत म्हणाली,

" हाय कुमार ! काय झालं हो हें ? आपल्यामध्यें अनंत आकाश पसरलें आहे. माझ्याभोंवतीं वडवानल पेटला आहे; पण तुमच्या हृदयछायेला कशी पोचणार मी ? "

" राधे, उठून डोळे धू पाहूं आणि रडूं नको मुळींच. रडण्यानें जर साऱ्या समस्या सुटल्या तर जगांत तत्वज्ञांचें काम नव्हतें. " त्यांच्या आवाजांत एक तऱ्हेचा हुकमीपणा होता. राधा उठून घरांत गेली.

...चांदणें बहरलें होतें. मोगऱ्याचीं फुलें फुललीं होती जणूं. राधा अंथरुणावर पडली होती. कुमार तिचा हात हातांत घेऊन जवळच बसले होते. तिच्या कपाळावरून आपला हात त्यांनीं फिरविला.

" राधाराणी मी आतां पूर्ण बरा झालों. आणि फिरून कधीं आजारी नाहीं पडायचा. माझी काळजी नाहीं करणार ना तू आतां ? "

राधा हंसली.

" तुमच्या तोंडांत साखर पडो ! "

" आशीर्वाद कशाला ? उठून घाल ना ? "

......" राणी मी तुला एक प्रश्न विचारणार आहे. उत्तर टाळूं नकोस. "

राधेला अस्वस्थ वाटूं लागले.

" प्रत्येक गोष्ट आपल्या पवित्र प्रेमाला स्मरून सांग... "

राधाराणी, तूं माझ्या हृदयाची राणी असली तरी, तुझ्या पायाशीं बसण्याचा हक्क मला आहे. खरं आहे ना हें ? "

राधा काय उत्तर देणार ? तिनें पुन्हा हुंदका दिला.

" राधा, रात्रींचें प्रेम सूर्यावर असतें. उलट तिला जन्म चंद्राबरोबर काढावा लागतो. म्हणूनच पौर्णिमेचें चांदणें भकास वाटतें. रात्र रडते कां त्यासाठीं कधीं ?......

......राधाराणी तू आपल्या जीवनांत सुखी होतीस कां ? ' तूं येथें कशी आलीस ? ' हा महत्वाचा प्रश्न नाहीं. तूं पुढें काय करणार ? ' मला सांग...

तुझ्या गळयांत मंगळसूत्र आहे. तूं धार्मिक विधीनें ज्यांची झालीस तें अजून सहचराचा हक्क सांगतात, असें वाटतें. तुझ्या दुबळेपणानें, एकाद्या जड वस्तूप्रमाणें, वासलात इतरांनीं लावली. बीज कुठेंही—कसेंही पडलें तरी त्याला मुळें फुटतात; आणि तीं त्या भूमींत जीव धरूं लागतात.

...लग्नानें तुझ्या भावना बदलल्या नाहींत. बदलत्या तर तूं संसाराचा त्याग माझ्यासाठीं केला नसतास. पण निसर्गाला मन ओळखूं येत नाहीं...

......" तुझ्या जीवनाच्या मुळ्या येथील भूमींत कितपत रुजल्या आहेत ? "

राधेनें निःश्वास टाकला. त्यांचा हात दाबीत ती म्हणाली.

" मी आपला एक प्राण तेथें ठेऊन आलें आहे. माझा जीव तेथें अडकला आहे. मी कधीं परत जाऊन बाळाला पाहीन ? "

" राणी, तुझ्या हातून फार मोठी चूक झाली. नदीच्या धारेंत नौका बुडाली. माझा हात धरून पैलतीराला जाण्याची तुझी तयारी नाहीं. तुझें मन कमकुवत आहे. आणि तुझ्या मुलामध्यें तुला परत नेण्याची धमक नाहीं ! हं ! " कुमार खिन्नतेनें म्हणाले.

राधेनें दोन्ही हातांनीं तोंड झांकून घेतलें.

" राधा-राधाराणी रडूं नको ग ! तुझ्या डोळ्यांत आंसवें पाहिलीं म्हणजे माझे प्राण कासावीस होतात. माझ्यामुळें तुला इतका त्रास होतो; आणि मी कांहींच करूं शकत नाहीं....

...तूं घर संसार मूल सोडून आलीस. जविन, मला केव्हां केव्हां फार अभिमान नी आनंद वाटतो. मातृहृदयाची नैसर्गिक ओढसुद्धां तुला पूर्णपणें मला दुरावूं शकली नाहीं.

...पण दुसऱ्याच क्षणीं माझ्या ध्यानीं येतें कीं, नैसर्गिक भावनांच्या चढाओढींत माझ्या दुर्दैवी राधेची रस्सी खेंच होते. आणि......

क्षणभर मलाही वाटतें.

" राधाराणी, काय झालं हें ? तुझ्यामाझ्यांत ही अनंत आकाशाची पोकळी कशी निर्माण झाली ? ही भरायची कशी ? "

किती वेळ तरी दोघेंही स्वस्थ होते. दिशा-तारा-रजनी सगळ्या खेळांत गुंतल्या होत्या. त्या मध्येंच पृथ्वीला म्हणत.

" इश्य, वसुधे ! ये की खेळायला. सदा आपल्यांतच काय दंग असतेस ? "

अखेर सृष्टी मनमोकळी हंसत त्यांच्या खेळांत सामील झाली. त्या हास्याचे तुषार चहूंकडे उडाले, आणि निजलेल्या झाडांचीं पानें मंद हंसलीं.

ह्या कोमल मधुरिमा-राधेला त्याची कोमलता टोचूं लागली. ती असहायतेनें म्हणाली—

" कुमार, मला बाळाकडे जायचं आहे ना ? "

" राणी, तुझ्या औषधावर काळ येवढेंच औषध आहे. धीर धर. "

" घर सोडतांना मला त्याची आठवण झाली नाहीं. तुमची शुश्रूषा करितांना माझें हृदय रडलें नाहीं. आतां मात्र परतण्याची मला ओढ लागली आहे हो ! मातृहीनता कशी असते ह्याची कल्पना तुम्हांला तितकीशी नाहीं; तुमच्या मावशीनें तुम्हाला प्रेमानें वाढविलें. परंतु आईच्या अभावी माझ्या आयुष्याची कशी धुळधाण उडाली हें मी कशी विसरेन ? माझ्या बाळाची हीच अवस्था होईल. त्याचे वडील लवकरच लग्न करितील–नव्हे आतांपावेतों त्यांनीं दुसरा संसार थाटा· लाही असेल. "

तुझ्या मनाची मला पुरी कल्पना आहे. पण परिस्थितीकडे लक्ष देणें तितकेंच आवश्यक आहे.

तूं हिंदू स्त्री आहेस. घराबाहेर पाऊल टाकतांच तूं पतित झालीस. पतितेला हिंदू समाजांत–हिंदू गृहव्यवस्थेंत स्थान नाहीं. परत जाऊन तूं काय करणार ? तुझ्या घरची मंडळी मला परिचित नाहींत. पण समाजाची मनोरचना मी पुरेपूर जाणतों. हिंदू स्त्रीला पश्चात्तापानेंही शुद्ध होतां येत नाहीं. समाजाच्या हिशेबी पतिता सडकी दुर्गंधि आहे.

" मला समाजाशीं काय करायचं आहे. रामला डोळे भरून पहावा हीच माझी इच्छा. "

" तुझें मन तुला फसवतें आहे. तुला तुझी आप्तमंडळी घरांत घेणार नाहींत. घेतलें तरी तुझ्याशीं कोणी आपलेपणानें वागणार नाहीं. तुझा विश्वास कोणाला वाटणार नाहीं. समाज तुझ्याकडे बोटें दाखवील.

" हीच–हीच बाई पळून गेली होती कुणाचा हात धरून. "

" इथें रहाणें मला अशक्य झालें आहे. मला बाळाचा ध्यास लागला आहे. त्याच्या वियोगानें मी मरून जाईन ना ! "

कुमार खिन्नपणें हंसले.

" जीवन, तुझें मन मला खरोखरीच विसरलें असतें, बहिणीच्या शुद्ध भावानें तुझे डोळे माझ्यावर खिळते, मातेच्या स्नेहानें तूं मला कुरवाळतीस, तर माझ्या भावना मी बाजूला ठेवल्या असत्या. मी तुझ्या-बरोबर तुझ्या घरीं गेलों असतों. तुझ्या आप्तांना तूं त्यांचीच आहेस हें पटवण्याचा प्रयत्न केला असता. जगाला मी बेपरवाईनें सांगितलें असतें.

"तुमचीं नाकें सडलीं आहेत. तुम्हाला कुजट घाण येते सगळीकडे "

पण राणी तुझ्या डोळ्यांत वेगळें पाणी खेळतें. शरीराचा कंप निराळा भाव व्यक्त करितो. रोमांचांतून अलग भावना प्रतीत होतात. तुला मी परत कसा पाठवूं ? 'धर्मेच अर्थेच कामेच' तूं परस्त्री आहेस. पण तुला अर्पण करितांना समाजानें तुझें मत विचारलें नव्हतें. तुझ्या हृद-याचें दान आधींच देऊन चुकली होतीस तूं ! राणीच्या उच्चपदावरून उचलून, समाजानें तुझ्या पायांत बेड्या घातल्या, तूं त्या घालूं दिल्यास, तुझ्या मनावर निसर्गानें मातृत्वाच्या तप्तमुद्रा केल्या आणि कायद्यानें तुझे हातपाय सर्वस्वी बांधले.

माझ्यापाशीं रहाणें जगाच्या दृष्टीनें पाप आहे. आणि जगाची तुला भीति वाटते, म्हणून तुला परत जाण्याची घाई झाली आहे. परंतु तूं परस्त्री मला नव्हतीस...जेथें तुला पापशंका यावयास पाहिजे होती तेथें आली नाहीं. चार अक्षता फेकून अंतःकरणाचे भाव रंगते तर ?

...आपल्या पापी जीवनांत पुन्हा पदन्यास करणेंच तुला योग्य वाटत असेल कदाचित ! पण नीट विचार कर. जगानें वापरलेलीं मापें नेहमींच सच्चोटीचीं नसतात. स्वतांची कसोटी त्यांना लाव, आणि मग माझा स्पर्श तुला पाप वाटेल तर तूं येथून अवश्य जा. पतीच्या राज्यांत तुला जागा नसेल तर अफाट आर्यावर्तांत कोठेंही पोटाला दोन घांस मिळवून खा. पण ह्या पापाच्या खाईत एक क्षणही घालवूं नकोस.

# खेद

सारा दिवस कुमार उन्हांतान्हांत हिंडत होते. काल रात्रीं राधेनें परत जाण्याचा निश्चय केला होता. कुमार कांहींच बोलले नाहींत. भीक मागणें व्यर्थ आहे हें ते जाणून होते. आजचें मरण उद्यांवर घालवाव-याचें एवढेंच.

वाहत्या नदींत पोहण्याचा आनंद अतीव असतो. बांध घालून अड-विलेलें पाणी सडतें, त्याची गोडीही उतरते. कुमारना या गोष्टी समजत होत्या. म्हणूनच दिलें तें प्रेमानें घ्यावें, नाहीं त्यासाठीं सत्याग्रह करणें व्यर्थ आहे अशी त्यांची वृत्ति होती.

तथापि एक विचार खोलांतून उडी मारून वर येत होता.

"राधेचें करणें योग्य आहे का ? राधा जाते ती सुखानें नव्हे तर कर्तव्याच्या कल्पनेनें," ही जाणीव त्यांना होती आणि तीच कुसळा-सारखी सलत होती. राधा मनानें आपली आहे, म्हणून निसर्गतः आपलें एकत्र राहणें नैतिक आहे. मानवी नियमांत अनेक चुका असतात त्या 'चुका' स्वतःच्या शरीरांत मारून घेण्यांत काय अर्थ ?

संत्रस्त मनानें कुमार घरीं परतले. राधेची तयारी—दोन लुगडीं व चोळ्या—झाली होती. ती माहेरीं जात आहे अशीच इतरांची कल्पना होती. कुमार शुद्धीवर आल्यापासून तिच्या तोंडीं माहेर होतें. भोंव-तालच्या मंडळींना वाटे, 'किती पोर गरीब आणि नवरा किती दुष्ट, इतकी तपस्या करून त्याला माणसांत आणला,—आणि चार दिवस माहेरीं जाऊं देत नाहीं.'

'राधा जाणार 'ही कल्पना प्रत्यक्षपणें घरांत वावरूं लागली. कुमार बाहेरून आले व अंगणांत खाट पडली होती त्याच्यावर बसले.

" जेवायला येतां ना ? "

" नाहीं. "

" म्हणजे ? "

कुमारनें उत्तर दिलें नाहीं. राधा त्यांच्या पायाशीं बसली. कुमारनें आपले पाय वर उचलले.

" माझ्या पायाशीं बसून मला खालीं मान घालायला कां लावतेस ?"

" कां बरें ? कुमार, तुम्हीं मला वडील भावाच्या ठिकाणीं आहांत. "

" राणी, ही आत्मवंचना व्यर्थ आहे. आपलें नातें बहीणभावंडांचें नव्हे. लाल रंग तुला हिरवा दिसला तरी मला तसा दिसत नाहीं. अंधळी कोशिंबीर खेळण्याचा अभ्यास मला नाहीं. "

राधेनें त्यांच्या मांडीवर मस्तक टेकलें. कुमारनें नकळत आपला हात तिच्या डोक्यावर ठेवला. " कुमार, आयुष्यांतील अनुपम आनंद मी तुमच्या हातीं लुटला. ह्यावेळीं तुम्हीं मला सोडूं नका. बाळाला मीं जन्म दिला, त्याचें संगोपन करणें माझें कर्तव्य आहे. "

" परत जाण्याचा अर्थ तुला समजतो राधे ? आपल्या पापी जीवनांत तूं परतून जाणार आहेस. आजपर्यंत एकट्या बाळाच्या संगोपनाची जबाबदारी तुझ्यावर होती. आणखी चार वर्षांत आपलें कार्यक्षेत्र वाढविण्याची तुझी इच्छा आहे ?......राणी, तूं माझ्या जीवनाचा मुकुटमणि आहेस भगिनीप्रेमाची किंमत मला समजते पण तुझ्याकडून मला त्याची अपेक्षा नाहीं. "

" किती, किती कठोर तुम्ही कुमार ? हृदयाचे धागे तोडून कर्तव्याची कांस धरतांना मला मागें ओढतां ! स्त्री प्रथम माता असते, मग प्रेयसी, सहचरी—सखी. "

" प्रथम तूं आपली कक्षा कां सोडलीस ? बाळाचा त्याग करतांना तूं माता नव्हतीस का ? "

" होतें. परंतु, माझ्या दुबळेपणापायीं तुमच्या जीवनाची राखरांगोळी झाली होती. झालेल्या चुकीची भरपाई करणें हेंही माझें कर्तव्य होतें."

" आत्यंतिक प्रसंगीं मातेचें नातें मागें ठेवावें लागतें हें तुला पटतें तर ?" कुमार उपरोधिक स्वरांत म्हणाले.

"इतका विचार करण्याइतकी शुद्धीवर नव्हतें मी. पण परमेश्वरानें ज्या अर्थीं माझ्या मनांत अशी प्रेरणा केली—"

"राधे, परमेश्वराला कशाला ओढतेस मधें ? स्वतःचा दुबळेपणा झांकायला परमेश्वराचा आधार लागतो. अपमानाचा—अन्यायाचा सूड घेण्याची अवकत नसली म्हणजे मनुष्य देवाचें नांव घेतो;—'पाहून घेईल परमेश्वर' आपल्या पायांकडे पाहण्याची लाज वाटली म्हणजेही देवाचा आधार घेतो मनुष्य. तूं घर सोडलेंस कारण तुझ्या सुप्त भावना जागृत झाल्या; त्यांनीं तुझ्या मनावर मात केली आणि तुला व्यभिचाराच्या गर्तेतून वर ओढलें."

"कुमार ! कुमार !!"

"तुला सत्य ऐकवत नाहीं, पण तें ऐकून घेण्यांतच तुझा तरणोपाय आहे. लग्नाच्या वेळीं किशोरीचें म्हणणें ऐकलें असतेंस व घर सोडून बाहेर पडली असतीस तर ही समस्या निर्माण झाली नसती. नंतरही घर सोडलें नसतेंस तर त्याचें स्वरूप इतकें विदारक झालें नसतें."

" कुमार, माझी गेल्या आठदहा महिन्यांची सेवा फुकट गेली !"

" काय उपयोग झाला तिचा ?"

" तुम्ही रस्त्यांत लोकांचे उष्टे तुकडे खात पडलां होतां.—" तिचें अंग शहारलें.

" मग त्यांतही तूं काय उपकार केलेस ? तुझ्या लग्नानें मला केवढा धक्का बसला ? लाहोरहून येतांच किशोरीची तार हातीं पडली. मला वाटे, मला स्वप्न पडलें. पण तार माझ्या हातांत—दोन दिवसांत पत्र हातीं आलें. रात्रीच्या रात्री भ्रमिष्टाप्रमाणें विचार करण्यांत घालविल्या.

तुला आटवत असेल, तुझें प्रेम मीं मागितलें नव्हतें. तुझ्या डोळ्यांतल्या अश्रूंनीं माझ्याजवळून भीक घेतली, आणि माझा अखेर विश्वासघात केला. माझ्या जिवाचे हाल निसर्गाला पाहवेनात. माझें वेड म्हणजे सृष्टीनें दया करून दिलेलें अमृत होतें.

हो, मी रस्त्यावर गटावर लोळलें असेन. मला त्याची जाणीव नव्हती व म्हणून दुःखही नव्हतें.

बेशुद्ध वैद्याला शुद्धीवर आणून छळ करण्याची प्रथा अनेक जागीं होती. तुझी पद्धत तितकीच क्रूर आहे. मी सारा जन्म पाण्याविना तडफडून मरावें ही तुझी इच्छा ! ”

राधेच्या नेत्रांतून अश्रुवर्षाव होत होता. कुमारचें हृदय त्वेषानें जळत होतें.

“ चूक माझी झाली. बाल्यापासून दुसऱ्याच्या वरवंट्याखालीं तुझी चटणी झाली होती. मला तुझा इतिहास कळला होता. अशा दुबळ्या हातांत आपल्या प्रेमाचा अमोल ठेवा मी कां दिला ? किशोरी व मी समानशील होतों. पण तेव्हां हा विचार मला पटला नाहीं.”

राधा डोळे पुसून उभी राहिली.

“ अजून किशोरीशीं लग्न करा ! ” तिच्या स्वरांत तीव्रता होती.

“ हें सांगायला तुझीच आवश्यकता होती. यालाच म्हणतात नशिबाचे खेळ.........

तुला मातेचें कर्तव्य पार पाडायचें आहे. काय कर्तव्य आहे मातेचें ? तुझें मन तिथल्या संसारांत नाहीं. स्वाभिमानाची मात्रा तुझ्यांत कमीच आहे. आतां त्याची राख अंगाला फांसून तुला संसारांत पाऊल टाकावें लागेल. आतांपावेतों तुझें आयुष्य म्हणजे प्रच्छन्न व्यभिचार होता. आतां कर्तव्याच्या नांवाखालीं वेश्यावृत्ति करणार तूं...”

राधेनें त्याच्या खांद्यावर मान टाकली आणि त्याच्या तोंडावर हात दिला. त्यानें तो हात काढून टाकला. तिला बाजूला सारीत तो म्हणाला,

" दूर हो ! आयुष्यांत एकदां तरी सत्य ऐक. दोन वर्षांत तूं मला विसरलीस नाहींस. विवाहाच्या नव्या नव्हाळीनें नाहल्यावरसुद्धां तुझा जीव पतीच्या जिवांत विरला नाहीं. तुझ्या स्मृतीवर हलकी साय मात्र धरली. ह्यापुढें मला तूं कधींहि विसरणार नाहींस. देह व मन यांची ताटातूट झाल्यावर तुझें कर्तव्य चांगलेंच पार पडेल. मातेच्या देहाची आवश्यकता मुलांना नसते. संसाराची सारंगी सुरावर वाजली तर त्यांतच त्यांचाही सूर मिळून जातो. मातेची योग्यता मला ओळखते. तिच्या त्यागाची जगाला आवश्यकता आहे. पण तूं आदर्श माता बनूं नयेस अशीच परिस्थिति समाजानें निर्माण केली होती, त्याला तुझा काय उपाय ?

—आपल्या पतीचें जीवन तूं पूर्वीच व्यर्थ केलें आहेस. ते तुला घरांत घेतीलच असें मला सांगवत नाहीं, आणि घेतलीच तरी तूं दुसऱ्याची आहेस, निदान होतीस हें किल्मिष त्यांच्या मनांतून कधींही धुवून जाणार नाहीं. तुझ्या माझ्या संसाराचीच गाडी काय ती रुळावरून चालूं शकेल. समाजाचे कायदे आपल्याविरुद्ध आहेत. परंतु आपण येथें परक्या देशांत आहोंत. येथें आपण आपलें चिमुकलें घरटें बांधलें तर तें निवाऱ्याला राहील पण तें कसें होणार ?

तुझा बाळ—त्याच्या विषयींचें कर्तव्य पुरें करायला जाणार ना तूं ? पाडाला आलेला बार पुढील रोपांच्या आशेनें खांचेंत घालणार तूं ! प्रत्येक कृपण पुढच्या पिढीसाठीं धनसंचय करणार. अशा किती पिढ्या जातील कोण जाणे ! कदाचित् त्याचा निर्वंश होईल, सारी संपत्ति चोरापोरी जाईल.

कर्तव्याला कुठेंतरी मर्यादा घालावी लागते. मूल जाऊं दे पण आई राहूं दे म्हणण्याचा अर्थ तोच."

" कुमार, नका माझें मन वळवूं. मी दुबळी आहें. तुम्ही माझें जीवन आहांत. तरीपण रामही मला तितकाच प्रिय आहे."

"तेवढ्याकरतां तूं मला सोडणें योग्य नव्हे. परंतु योग्य उपाय समाजाच्या दप्तरांत नाहींत. तूं जर रामला आपल्या संसारांत आणूं शकतीस तर ?

" पण राधे ही सुद्धां आत्मवंचना आहे. बाळाकडे तुझा जीव ओढतो खरा. तथापि बाळ तुझ्याकडे आला तरी माझ्या जीवनांत समरस होण्याचें धैर्य तुला नाहीं. तूं अत्यंत दुबळी आहेस. आजच्या समाज जीवनांत हिंदु-लग्न म्हणजे न सुटणारी व न तुटणारी गांठ आहे. पतिपूजेच्या वेड्या कल्पना, पापपुण्याचे चूक विचार तुझ्या रोमरोमांत भरले आहेत.

"......राणी, राणी, अजून विचार कर ग ! तुझ्या इच्छेविरुद्ध मी तुला कसा ठेवून घेऊं ? पण......तूं गेल्यावर पुन्हां सारा अंधार ! मी वेडाच कां नाहीं राहिलों ?"

# विचार

कुमार गेले दोन दिवस सारखा विचार करीत होते.

" आपण राधेचें मन परावृत्त करण्याचा प्रयत्न करितों, तें योग्य आहे काय ? "

ती सासरीं परत जाईल. घरांतली मंडळी चांगली असतील किंवा वाईटही. त्यांनीं तिला घरांत घेतली, तर तिची गाडी फिरून रुळावर येईल. शेजारणी तिला पाहून कुजबुजतील आपसांत. तिला जातांना पाहून चार शिष्ट म्हणतील,

" हीच बया पळून गेली होती घरांतून. "

परंतु कालांतरानें ही स्मृति बोथटेल. तिचे यजमान तिच्याशीं सरळ वागणार नाहींतही प्रथम. परंतु आपण तिच्या जीवनावेगळे झालों तर ती फिरून संसारांत रमेल कदाचित्. तिला स्वतःचे विचार नाहींत. रूढि व संस्कार यांनीं तिचें मन बांदिवान केलें आहे. तिचें मन कमावलेल्या मातीसारखें आहे. ज्या ठशांत दाबावें ती मूर्ति तयार.

"......मग तिला जाऊं न देण्याचा अट्टाहास कां ? परत जाऊन मातृकर्तव्य पार पाडण्याची कल्पना हास्यास्पद असेल; पण म्हणून काय झालें ? तीच कल्पना तिच्या आयुष्याला उपकारक ठरेल.

—मला त्यांत किळसवाणी वेश्यावृत्ति दिसते. असेलही ती तिथें. पण प्रत्येकाचें जिवन ' सत्यं शिवं सुंदरम् ' च्या पायावर उभारण्याचा ठेका मी घेतला नाहीं. राधेचा विवाह झाला, त्याच दिवशीं माझा व तिचा संबंध सुटला खरोखर.

—संसाराचा त्याग करून ती माझ्याजवळ राहिली तर?—तर मला आनंद वाटेल. प्रेमाला कोणी विष म्हणो वा अमृत! प्रेम हें एक मानवेतिहासांतील सत्य आहे. विष वा अमृत; त्याचें अस्तित्व आहे खास! आणि माझी प्रेयसी मला मिळावी असें मला वाटतें. दारू वाईट म्हणून जगानें कंठशोष केला तरी मद्यपि मदिरा सोडीत नाहीं. राधा माझ्याजवळ राहिली तर माझ्या जीवनाचें सार्थक होईल

......पण तिचें काय? मी तिला काय देऊं? प्रेमानें पुरुषाचें समाधान होतें. पण राधा स्त्री आहे. पुरुषाचें प्रेम हा तिच्या जीवनाचा पाया आहे. आपल्या संसाराची इमारत ती त्यावर उभारते. मुलें-बाळें, घरदार—ऐहिक गोष्टींत ती आकंठ डुंबत असते. मुलें बाळें दिसतांच तिला नातवंडांचीं स्वप्नें पडूं लागतात.

स्वतःचा पुत्र सोडून माझ्याजवळ राहणाऱ्या राधेला मी काय देऊं? हिंदु कायद्यानें ती परस्त्री आहे. कायदा हेंच सांगणार कीं, तुम्हीं व्यभिचार करीत आहां. आमच्या मुलांच्या कपाळीं हाच शिक्का मारणार—'बेकायदा!' आणि समाज तापलेल्या मोहरा उठवणार—'पापी!'

ज्या मुलांमुळें घराचें नंदनवन व्हावें त्यांच्या आगमनानें डोळ्यांत पाणी येऊन वाटेल,

'आम्हां अभाग्यांच्या घरीं कशाला आलांत फुलांनो!'

इथेंही केव्हां ना केव्हां सत्य बाहेर येऊन लोक कुजबुजणार.

'अहो पळवून आणली आहे नवऱ्याकडून'

ही कुजबुज वाढत जाणार. पुढेंमागें मुलांचा प्रश्न उपस्थित झाला म्हणजे प्रत्येक व्यक्ति बजावणार.

'संभाळा, पापाचीं फळें आहेत हीं. फसवून तुमच्या पदरीं बांधतील.'

माझी संपत्ती तिला पचूं नये म्हणून भाऊबंद खरेखोटे खटले उभे करतील; नोकरी करण्याची धमक तिला नाहीं; आणि असती तरी

तिच्या पापाचे झेंडे पुण्यालयांनीं अटकेवर फडकवले असते. आणि कष्टानें-अब्रूनें जगांत दिवस काढणें तिला अशक्य केलें असतें.

उद्यां तिच्या नांवचें मृत्युपत्र करुन मी मेलों तरी आप्त म्हणतील, 'अवदसेनें विष घातलें. मृत्युपत्र खोटें आहे. बेशुद्धींत सही घेतली.'

आणि अशा परिस्थितींत दुपारची भूक भागविण्याचा एकच मार्ग तिच्यापाशीं राहील—देहविक्रय ! ती भोळी आहे, तिचा स्वभाव लतेचा आहे; त्याचा फायदा घेणारा पुण्यात्मा तिला तेव्हांच त्या रस्त्या-वर नेऊन पोंचविल.

— मग....मग...मी आपल्या हातीं तिला 'कायदेशीर वृत्तींत' कां नको पोंचवूं ?

.......संसार दोघांचा असतो. पापपुण्याच्या ओतीव कल्पनांनीं आपल्या प्रेमाला मूर्त स्वरूप देण्याची कल्पना तिला भयंकर वाटते. तिचा स्वतःवर विश्वास नाहीं. एक दिवस तिचा अधःपात होईल. ह्या अधःपाताचा भागीदार मी होऊं ? ' माझें कृत्य बरोबर आहे ' असें समाजाला सांगून विरुद्ध जाणारी व्यक्ति निराळी. आपल्या कृतीचा तिला पश्चात्ताप होत नाहीं. उलट, नाइलाज म्हणून अगर मन ताब्यांत न राहिल्यानें एखादें कृत्य हातून घडणें निराळें. मनाला अयोग्य वाटणारें कृत्य करणें हेंच स्खलन आहे. ही वृत्ति राधेनें दाखविली, तर मला किती आनंद वाटेल ! मला आनंदानें, स्वेच्छेनें दिलेलें व तेंही सर्वस्वाचें दान मिळालें तर पाहिजे. नाहींतर मी उपाशीं राहीन."

.......असेच अनेक विचार कुमारच्या मनाला दोन दिवस जाळीत होते. आपण राधेला त्या दिवशीं त्वेषाच्या भरांत बोललों याचा त्यांना खेद झाला. आणि अखेर भिन्न वृत्तींमध्यें घोर संग्राम झाल्यावर राधेनें जावें असेंच त्यांनीं ठरविलें.

पण तिला पाठवायची कशी ? तिच्या घरीं तिला नेऊन पोंचवणें त्यांना अशक्य वाटलें. तिला तिकिट काढून वाऱ्यावर सोडून देणेंही

त्यांना योग्य वाटेना. ती गेली आणि घरच्या मंडळींनीं घरांत पाऊल नाहीं टाकूं दिलें तर ? त्यापेक्षां पत्र लिहून पहावें. त्यांनीं बसून पुष्कळ विचारांतीं पत्र लिहिलें. मजकूर त्रोटक पण स्पष्ट होता.

" सौ. राधा गेल्या श्रावणापासून येथें आहे. मी त्यावेळीं वेडा असल्यानें मला सोडण्याचा प्रश्न नव्हता. सुदैवानें माझी विचारशक्ति आतां निवळली आहे. त्यामुळें ती परत जावयाला उतावीळ झाली आहे."

" ......ह्या सर्व गोष्टींचा विचार करून मी तिला केव्हां पाठवूं तें कळवा."

राधेच्या संमतीनें त्यानें तें पत्र पोस्टांत टाकलें. ह्या पत्रांत अनेक गोष्टींबद्दल मौन होतें ही त्याला जाणीव होती.

राधेनें इतके दिवस पत्रव्यवहार कां केला नाहीं, त्याचा व तिचा संबंध काय होता......

पत्र टाकल्यावर कुमारच्या मनाला हुरहुर लागली. राधेचें गमन इष्ट आहे हें बुद्धीला पटलें होतें; पण भावना पुनः पुन्हां सांगत होती,

" माझें अन्नपाणी तोडूं नका. मी मरून जाईन."

ज्या नियमांमुळें भावना व बुद्धि यांच्यांत भेद येतो ते नियम व्यक्तीला आणि परिणामीं समाजाला मारक असतात. बुद्धि आपल्या तीव्रतेनें भावनेला दिपविते व तात्पुरती विजय पावते; पण भावना अत्यंत चिवट असते. आपला वरचष्मा होईतों ती झगडत राहते व अखेर स्वतःच्या मार्गानें मनुष्याला फरफटत नेते. एकदां बुद्धीला हतबल केल्यावर नव्या खडकाळ कांटेरी मार्गांतून आपल्या बळीचे हाल करणें हेंच तिचें अंतिम ध्येय !

दुर्दैवी बलि ! या संग्रामांत त्याच्या सर्व शक्ति अकारण झिजत असतात. विचारक्षम, भावनाप्रधान, सुसंस्कृत माणसाची अशी विल्हेवाट लावल्यावर समाजाच्या हातांत काय उरतें ? मातीचीं मडकीं !

......पत्र गेल्यावर राधेचें मन फार अस्वस्थ झालें, पण बाळ भेटणार म्हणून आनंदही झाला.

......ती श्रीकृष्णमूर्तीची पूजा करीत होती. कुमारांना कौतुक वाटलें. आर्यस्त्रीच्या पूजेच्या मूर्ति कृष्ण आणि वृंदा! त्याच्या तोंडावरचें हास्य विरून त्याची जागा खेदानें घेतली. अंधश्रद्धा! हिच्याच जोरावर हिंदुधर्म दोन हजार वर्षें तगून आहे.

राधेचें लक्ष त्यांच्याकडे नव्हतें. ती भजनांत रंगली होती.

पंढरपूर परगणा। देवाच्या दरवाज्यावर
मोत्यांचा पाळणा।
हलवा ग बायांनो, हलवा ग सयांनो
दाशरथे रामाला मी गुंतलें कामाला॥

तिच्या करुण स्वरानें भजन कांहीं निराळेंच वाटलें कुमारना. त्यांनीं एक निःश्वास टाकला व ते परत गेले.

कुमारना आतां एकच आशा वाटत होती. राधेची आप्तमंडळी तिला घरांत घेण्याचें नाकारतीलही! राधा आपली पत्नी या नात्यानें आपल्याजवळ न राहिली तरी प्रेयसी, सखी ह्या नात्यानें राहील.

ते आपल्या मनावर दाब ठेवण्याचा प्रयत्न करीत होते. राधा मृत आहे; जीवनाशीं मृत्यूची जन्म गांठ बांधणें इष्ट आहे काय? किशोरीनें राधेवर निस्सीम प्रेम केलें. जळती ज्योत किशोरी तिलाही राधेचा मृत स्पर्श मानवला नाहीं. स्वतःचें संरक्षण करण्यासाठीं ती राधेपासून दूर पळून गेली.

राधा माझी अमृत आहे; परंतु प्रेम काय सहन करूं शकतें? रोज तिची लवचिक मनोवृत्ति पाहून मला तिटकारा नाहीं का येणार?

हे सर्व मनाला फसविण्याचे प्रयत्न होते. त्यांत कुमार यशस्वी होण्याचा संभव नव्हता फारसा. कुमारचें प्रेम निवळ भावना, वासना यांचें मिश्रण नव्हतें.

गेल्या दहा अकरा महिन्यांत राधेनें कुमारना नवें जीवन दिलें होतें. सकाळच्या कोंवळ्या सूर्यकिरणांत फिरतांना कुमारना वाटे.

" राधेची दया ही !"

सकाळची प्रसन्न शोभा, रात्रीची उन्मादक कौमुदी, मंजुळ गाणें, सुंदर चित्रकला, सुसंस्कृत मनाला आनंदविणारी कोणतीही गोष्ट पाहिली म्हणजे त्यांचें मन म्हणे.

" कुमार, ह्या जगाला तूं मेला होतास. नव्हे हें जग तुला मेलें होतें. राधेनें तुला जीवदान दिलें होतें. "

ते हंसत राधेपाशी जाऊन म्हणत, " जीवन चल आपण घटकाभर फुलांत फुलें होऊं. "

दोन मानवी अंतःकरणांत जितके निकट बंध निर्माण होणें शक्य होतें तितके प्रकृतीनें उत्पन्न केले होते. दृढालिंगनांत गुंतलेलीं दोन हृदयें तटातट तोडायचीं होतीं.

म्हणूनच मनाला दिलेली शिकवण व्यर्थ जाऊन कुमारचें हृदय कळवळून म्हणे,

" जीवन, ह्यापेक्षां मी वेडाच कां नाहीं राहिलों !

Better to have loved and lost.

पण राणी मला वाटतें कधीं प्रेम न करणें हेंच चांगलें.

प्राण ! प्रेम हें विष कीं अमृत ! "

# राम

राधेच्या डोळ्यांतून अश्रू गळत होते. कुमारना सोडतांना तिला खेद झाला. पण पापपंकातून उद्धार होणार म्हणून जरा हायसें वाटलें. कुमार दृष्टिआड होतांच तिच्या पदरांत खेद मात्र उरला.

तिनें नीलकंठांचें पत्र पुनः वाचून काढलें. पत्र लहान होतें. त्यांत " सौ. ला पाठवून द्यावें " इतकाच मजकूर होता. तिला थोडी भीति, थोडी उत्सुकता वाटत होती. रस्त्यांत खोड्या करून येणाऱ्या मुलाला असेंच कांहींसें वाटत असतें.

...नीलकंठ स्टेशनावर आले होते. त्यांनीं तिला उतरून घेतली. दोघेंही रस्त्यानें बोललीं नाहींत. राधेनें तर खालची मान वर उचलली नाहीं. कुमारच्या मस्तकावरून प्रेमभरानें हात फिरवणारी प्रणयिनी राधा —तिचा ह्या राधेंत अंशही नव्हता. तिनें पूर्ववत खालच्या मानेनें, मौन धरून जीवनास सुरवात केली.

...तिला गाडीचा विटाळ झाला होता. नीलकंठांनीं एक पांढरें पातळ तिला बदलावयास दिलें. राधेला घरांत चोरासारखें वाटत होतें. तिनें हळूंच कपडे बदलले व स्वयंपाक घरांत गेली. सासूला नमस्कार केला. त्या तिच्याशीं बोलल्या तर नाहींतच पण आशिर्वादही दिला नाहीं. राधा मनांत चरकली. नीलकंठांनीं चहा मागितला. राधेच्या नणंदेनें चहा करून दोघांनाही दिला. राधेच्या नजरेतून नणंदेचें उप-हासगर्भ हास्य सुटलें नाहीं. तिच्या पोटांतून उमळून आलें.

तिचे डोळे रामला शोधीत होते, पण तो तिला दिसेना. चहा पिऊन तिनें दोघांच्या कपबशा विसळल्या व जमिनीवर पालथ्या घातल्या.

' राधा अस्पृश्य रहावी ' हें स्त्रियांनीं आधींच ठरवून ठेवलें होतें जणूं, आणि राधेला तें मान्य करावें लागलें. आपलें माणिक आपल्याला लाभावें म्हणून ती धांवत घरीं परतली होती—नव्हे तिला तसें वाटत होतें—तिचा हात दगडाखालीं होता. येईल तें सहन करणें भागच होतें तिला. तिनें जीव मुठींत घेतला होता.

बाळाच्या भेटीसाठीं तिचा जीव तळमळत होता; पण त्याची चौकशी करण्याचें धैर्य मात्र नव्हतें. ती तेथेंच मान खालीं घालून बसून राहिली.

...संध्याकाळ होत आली, तरी राम दिसेना. तिचा जीव घाबरा झाला. तिच्या मनांत ' वेडेवांकडे ' विचार येऊं लागले. अनेक दुष्ट कल्पना तिला सतावूं लागल्या. परसूदारीं तुळशीवृंदावनापुढें जाऊन बसली ती. तुळशीपुढें हात जोडून मनोभावानें तिनें प्रार्थना केली. ती तेथेंच बसली होती, इतक्यांत नीळकंठ आले.

" तू येथें कां बसली आहेस अशी ? "

' बाळ कुठें आहे ? ' तिनें धीर करून विचारलें.

" आपल्या काकासह गेला आहे वलबांत. "

" मी येणार त्याला सांगितलें नव्हतें ? "

" ' तुझी आई येणार ' हें दोन दिवसांपासून सांगतों आहे त्याला." नीळकंठाच्या आवाजांत तीव्रता आली. " पण त्याच्या शब्दकोशांत आई ह्या शब्दाला अर्थ नाहीं. तो नेहमींप्रमाणें फिरायला गेला."

राधेचे डोळे विस्फारित झाले. बाळाला आईचें प्रेम अपरिचित आहे तर! तिला अस्वस्थ वाटूं लागलें. हृदय जणू आंतून कोणी पोखरीत होतें. ती मटकन खालीं बसली.

......राम रात्रीं आठच्या सुमारास आला. तो सरळ घरांत आजी-जवळ गेला. राधेला तो बराच मोठा व मोहक वाटला. त्याच्या अंगांत

आता सरकफांसाचा सदरा नव्हता. तर खाकी चड्डी व शर्ट होता. डोळे पाणीदार आणि खट्याळ दिसत होते.

आजी सोवळ्यांत होतीं.

" राम शिवशील बरं ना ! " म्हणून बजावतां पुरेवाट झाली.

तो चुरचुर बोलायला शिकला होता.

" बरं का आजी ! काकाच्या 'कलपां'त एक दोन खूब साहेब येतात......अन् आजी मोटर कशी जाते ?...भर्रर्रऽऽऽ" त्याची बुडबुड चालली होती सारखी.

मध्येंच कोणीसें म्हणाल

" राम तुझी आई आली आहे. पाहिलीस का ? "

" कुठें आहे ? " रामच्या शब्दांत उत्सुकता होती, पण आई ही नवी वस्तू पहाण्याची. त्याच्या आतेनें त्याला उचलून राधेपुढें उभा केला. राधा आशेनें पुढें झाली. रामला उचलून पोटाशीं धरण्याची आशा—इच्छा आज तृप्त होणार होती. तिचें भुकेनें मातृहृदय पुढें धांवलें. त्याला जवळ घेण्यासाठीं तिनें हात पुढें केले.

राधेच्या मुखावर एक तऱ्हेची खिन्नता होती. त्यांत रामला ती अपरिचित. तो खाडकन मागें सरला. आतेच्या पायाला त्यानें मिठी घातली.

' राम ! येरे राजा ' करुण स्वरांत राधेनें विनवलें. तो आतेला जास्तच बिलगला.

' ये. शहाणा आहे राजा तो ! '

' अरे राम, जा. आई आहे तुझी ती. ' नर्म उपहासानें आत्या म्हणाली. तिनें त्याला कडेवर घेतला.

' बघ तर खरी तुझी आई.' रामनें क्षणभर राधेकडे पाहिलें व मान मुरकीत म्हणाला.

' मला नाहीं मला आई आवडत ! मी नाहीं जात तिच्याकडे.'

" असें म्हणूं नये हो ! बाबा रागावेल. " आतेला मनांतून आनंद झाला. राधा परत यावी हें कोणालाच पसंत नव्हतें. तथापि नील-कंठांच्या हट्टापुढें इलाज नव्हता. केल्या 'करणी' बद्दल राधेला घालून—पाडून बोलणें येवढेंच त्यांच्या हातीं.

रामची मुद्रा थोडी विचारमग्न झाली. नंतर तो म्हणाला.

' बाबा रागावेल ? कां म्हणून ? '

राधेनें त्याला घेण्याचा आणखी एक प्रयत्न केला. रामची इच्छाशक्ति प्रबल होती. त्याला जुलूम मानवत नसे. आपल्या बारिक व तीक्ष्ण दातांनीं राधेच्या हाताला त्यानें कडकडून चावा घेतला.

आतेच्या कडेवरून तो उतरला. त्याला 'आईचा फार राग आला होता.'

" ' आई ' वाईट आहे. बाबा—ए—बाबा..." तो तेथून गेला. राधेचें भवितव्य मातीला मिळालें. कुमारना सोडतांना रामचा आधार तिनें घेतला होता. 'स्त्री प्रथम माता असते' हें तत्व घोकीत ती 'घरीं' आली. तिच्या बंडखोर मनाला हाच लगाम तिनें घातला होता. तो चांगला कणखर आहे, असा तिला विश्वास होता. पण—रामनें तो धका खटक्यासरशीं तोडून टाकला.

रामला तिची तिळमात्र आवश्यकता नव्हती.

" जगांत सर्व मिळूं शकेल, पण आई नाहीं मिळणार." कोणी मातृ-भक्त कविनें म्हटलें आहे. पण रामला आई नकोच होती.

राधेची निराशा—निराशा झाली. तिनें डोकें जमिनीवर टेंकलें. ओंठ घट्ट चावून ती हुंदका आवरीत होती.

ह्या घरांत ती आतां परकी झाली. तिला येथें ओढून आणणारा धागा तुटला. धर्मानें तिच्या पदराची गांठ नीलकंठांच्या उत्तरीयाला दिली होती. सत्वाचें रक्षण करणारा परमेश्वर पुढच्या प्रसंगांतून आप-

त्याला पार पाडील अशी तिला आशा होती. रामच्या जिवावर सगळें सोसतां येईल, असेंही तिला वाटलें होतें. पण...पण...

बाहेर रामचा आवाज ऐकूं येत होता.

" बाबा एक ' आई ' आली आहे आज."

" अस्सं ! मग तूं गेलास कां तिच्याजवळ ? "

" अंहं ! " तो मान हलवीत गंभीरतेनें म्हणाला. नंतर त्याला थोडें हंसूं आलें.

" मी तिला मोठ्यानें डसलों "

" चल वेडा ! आईला डंसतात का आपल्या ? "

" मग ती मला घेते कशाला ? "

" तुझी आई ना ती ? "

" माझी ? अन् तुझी ? "

" माझी आई स्वयंपाक घरांत आहे. सैंपाक करते आहे ती माझी आई."

' चांगली आहे रे ती ! तूं तिला एक पापी दे. जा ! '

' अंऽऽऽ मी नाहीं. रामनें अंग घुसळून सांगितलें.'

राधेच्या कानावर सारा संवाद जात होता. आतांपावेतों ' आईचें कर्तव्य ' करण्यासाठीं आली होती ती. ' आत्मयशा'चा थोडासा भाव तिच्याठायीं होता. ह्या भावनेनें अनेक व्यक्तींना आपलें आयुष्य सुखांत घालवतां येतें. राधा बाल्यापासून ' उकिरड्या'वर वाढली. पुढें अचानक ' परक्या ' हातीं पडली. इच्छाशक्तीचा उपयोग तिनें कधीं केला नव्हता. त्यामुळें ' त्याग हेंच जीवन ' हा धडा तिनें गिरवला होता. आज तिचा त्याग लाथाडून अजाण रामनें तिच्या पायाखालची फळी ओढून घेतली; सहजच राधेच्या मानेला फांस लागला.

तिच्या मनांत मानवी ईर्षा उत्पन्न झाली. ' राम माझा आहे. माझ्या रक्तानें त्याचा पिंड पोसला. माझ्यापासून त्याला तोडण्याचा इतरांना

काय हक्क? मी त्याला आपला करीन. मातृप्रेम नैसर्गिक आहे. निसर्गबंध तोडून लवकर तुटत नाहींत. पण हें ध्येय गांठायचें कसें हें कोडेंच होतें. घरांतली मंडळी रामशी वाईट वागती तर तो चटकन तिला बिलगता. पण घरांत एकच मूल—साहजिक तो सर्वांचा लाडका होता. राधेबद्दल कोणालाही सहानुभूति नव्हती. त्यामुळें तसें सोंगही करणें कोणी शक्य नव्हतें. राधा स्वतः अत्यंत साधी होती. इतरांना आकर्षित करण्याची कला तिच्या अंगीं नव्हती. कोण जाणे......निसर्गानें—नव्हे तिच्या नैसर्गिक ईर्षेनें तिला कांहीं शिकवलें असतें. 'जात्यावर बसलें म्हणजे ओवी सुचते.'

......पुढें ठेवलेले दोन घांस राधेनें कसेबसे पोटांत ढकलले; आणि आपल्या खोलींत बिछान्यावर जाऊन पडली. तिला एक स्वतंत्र खोली दिली होती. तेथें फक्त एक बिछाना होता. बाकी सारी खोली रिकामी! नाहीं म्हणायला तेथील खिडकींत दोन तीन पुस्तकें—समाज-शास्त्रावर—पडलीं होती.

पुस्तकें चाळण्याइतकें राधेचें मन शांत नव्हतें. तिच्या डोक्यांत पवन-चक्की फिरत होती.

"आपण काय केलें हें? आपल्या संसाराला आपण आपल्या हातीं आग लावली. ह्या राखेचे मनोरे उठणार कां पुन्हां?"

घरांतल्या मंडळीची वागणूक 'ताणून' आहे हें तिला दिसत होतें. नीलकंठ? तिनें पातिव्रत्याचे धडे हृदयाला देऊनही, त्यांचें दर्शन टाळावेंसें तिला वाटत होतें. निदान तिला एकांत नको होता. "ते आपल्याला काय विचारतील?—काय म्हणतील?..."

ह्या घरांत आपला निभाव कसा लागायचा? ही समस्या मी आपल्या हातीं निर्माण केली. मी जन्माची अभागिनीच खरी! मनाला जरा शांति लाभते. सुखाचा पेला हातीं येतो, आणि दैव कोठून तरी ठोकर देऊन जातें.

माझें आयुष्य चेंडूचेंच अखेर. सुखाची आशा करणें व्यर्थ आहे. परमेश्वरा कां माझा अंत पाहतोस. आमच्यासारखी दुर्दैवी माणसें मेलेलींच बरी.

पलीकडच्या खोलींत पावलांचा आवाज आला. नीलकंठांचीं पावलें तिनें ओळखलीं. तिच्या छातींत धडकी भरली. डोक्यांत झिणझिण्या आल्या. आपल्याला काय होतें आहे तिला कळेना. दोन्हीं हातांनीं तिनें मस्तक घट्ट दाबून धरिलें.

# मातृत्व

अष्टमीचा चंद्र डोक्यावर येत होता. त्याचे शेवटचे किरण राधेच्या तोंडावर पडले होते. ती उजव्या कुशीवर निजली होती.

नीलकंठ हलक्या पायांनीं आंत आले. खाली वाकतांच ती झोंपली असल्याचें त्यांच्या ध्यानांत आलें. तिच्या कपाळावर रुळणारे केंस हलक्या हातीं त्यांनीं बाजूला सारले. तिचें अंग त्यांच्या स्पर्शानें थरारलें. तें त्यांच्या दृष्टींतून सुटलें नाहीं.

त्यांनीं तिला जरा हलवून जागवली. ती अर्धजागृतींत असल्यामुळें लागलीच उठून बसली. परंतु तिच्या अंगावर आलेला शहारा व ओलसरपणा नीलकंठाच्या ध्यानीं आला.

ते आंथरुणावर एका टोंकाला बसले.

" तुला आज झोंप लवकर आली ? "

" आतांच पडलें होतें."

फिरून सगळें शांत झालें. पुष्कळ वेळानंतर नीलकंठ म्हणाले,

" तुला येऊन आज आठ दिवस झाले. अजून तूं घरांत रुळली नाहींस."

ती बोलली नाहीं. ती जराशी गोंधळली होती. गेल्या आठ दिवसांत तिचें त्यांच्याशीं बोलणें झालेंच नव्हतें. घरांत ती अजूनही अस्पृश्य होती. राम तिच्याजवळ जात नसे—नव्हे, त्यानें जावें अशी कोणाची इच्छाही नव्हती. तिला उघडपणें कोणी टाकून बोलत नसे एवढेंच.

या अवधींत ती घराच्या बाहेर पडली नाहीं. जाणार कुठें ? घरांत तिला प्रश्न करणारें कोणी नव्हतें. बाहेर काय—ज्याच्या ज्याच्या तोंडाला जें जें येईल तें तो बोलणार, विचारणार. दिवस तिला युगासारखा भासे. काम कांहीं नाहीं. बोलायला कोणी नाहीं. रडून रडणार तरी किती ? नीलकंठांची उपेक्षा तिला असह्य झाली.

" मला येथें येवव्यासाठीं बोलावली माझ्या अपराधाचें घोर प्रायश्चित्त द्यायला ? आपलें आयुष्य आतां असेंच का जाणार ? "

कुरकुरण्याचा तिचा स्वभाव नव्हता; पण दुसऱ्याच्या पोटांत शिरण्याची कलाही तिला अवगत नव्हती. त्यामुळें ह्या चक्रव्यूहांतून बाहेर पडायला तिला मार्ग दिसेना. आपण परतण्यांत चूक केली काय ? असले प्रवाह तिच्या अंतर्यामी आंतून वाहूं लागले होते. ती सगळी खळबळ दाबून टाकण्याचा प्रयत्न करी. ' कुमार मला भावासारखे ' हें ती मनाला सारखी शिकवीत होती. ' घरीं येणें माझें कर्तव्य होतें—तें मी केलें. प्रत्येकानें आपलें कर्तव्य करीत रहावें. ' असली भाषा ती मनाला शिकवूं लागली. नीलकंठांना आज अचानक पाहून काय बोलावें तिला सुचेना.

" अशा रीतीनें तुझा घरांत निभाव कसा लागणार ?...

......तूं परत कां आलीस ? कुमारना मी पत्र लिहिलें होतें. सविस्तर उत्तर मला काल मिळालें. तुमच्या मैत्रीचा इतिहास त्यांनीं आमूलाग्र दिला आहे. अजूनही त्यांना तूं प्रिय आहेस. त्यांच्या प्रेमासाठीं तूं स्वताच्या आयुष्याचा होम करावा असें माझें म्हणणें नाहीं. पण मला तुझेंही मन स्वच्छ दिसत नाहीं. माझ्याबद्दल तूं उदास आहेस. माझ्या स्पर्शानें झोंपेंतही तुझें अंग थरारतें. तुझा जन्म कसा जायचा इथें ? "

नीलकंठांच्या वाक्यावाक्यानें तिची भावगंगा उचंबळत होती. मोठ्या कष्टानें तिनें म्हटलें.

" मी आपल्या पायीं आलें आहे. मला समजत नाहीं. मी अज्ञ आहे. आपण सांगाल तें मला मान्य आहे."

" मी तुला काय सांगणार ? ही समस्या तुझे भित्रेपणानें निर्माण झाली. लग्नापूर्वी कांहीं शिंतोड माझ्या अंगावर आले होते. परंतु कॉलेजच्या विद्यार्थिनींबद्दल वाटेल त्या कंड्या पिकतात, हा माझा अनुभव होता. असल्या गटारगप्पांवर विश्वास ठेऊन लग्न नाकारणें मला नीचपणाचें वाटलें."

" चूक सर्वस्वी तुझी झाली. मन एकाला आधींच दिल्यावर, ह्या विवाहाला तूं मान कशी वांकवलीस ? मला सत्य कळवतीस तर हा गोंधळ न होता. आज तुझ्या मूर्खपणानें तीन जीव घायाळ झाले. निरपराधी रामच्या आयुष्यावर परिणाम होईल तो निराळाच."

" माझ्या अंगांत एकदम धीटपणा कुठून येणार ? प्रसंग आला म्हणजे मांजर गुरगुरतें पण वाघाची उडी नाहीं मारीत.

" जीव देणें येवढा एकच मार्ग दिसतो मला ! मी परत तरी कशी जाऊं ? कुमार परपुरुष आहेत. त्यांच्या जवळ जन्म काढण्यानें माझ्या हृदयाला सुया लागतील."

" कुमार तुला परके नाहींत. परका मी आहे. तुला ते आज परके वाटतात. कारण विवाहग्रंथीनें तुला माझ्याशीं बांधलें आहे. तुझ्या मनाला इंगळ्या तेव्हां लागायला पाहिजे होत्या. ह्या घरांत तूं सून म्हणून कशी नांदूं शकलीस ?

" आणि...माझा राम तुम्ही हिरावलांत. त्याच्यावाचून कशी जगूं मी ?" ती रडत म्हणाली.

नीलकंठ उपहासानें हंसले.

" आई सारखें प्रेम नाहीं, म्हणतात. मी म्हणतों आईचें प्रेम स्वार्थ निरपेक्ष नसून अत्यंत स्वार्थी मात्र आहे. रामला सोडून जातांना तूं

त्याचा विचार केला नाहींस. तुझ्यामागें, आतेच्या परक्या घरीं, त्याच्या चिमण्या जिवाचे काय हाल झाले, तुला काय कल्पना ? कांहीं दिवस तो झुरणी लागला. त्याच्याकडे पाहून मला वाटे, तुझ्यावर झडप घालून तुझी मान मुरगाळावी. सुदैवानें तूं फार–फार दूर होतीस.

"हलुहळूं तो तुला विसरला. ज्या 'आई' शब्दानें त्याचा कोश सुरू झाला, तो शब्द त्याच्या भाषेंतून नष्ट झाला.

" आज तुला अचानक त्याची आठवण झाली. तूं परतून आलीस. त्याला छातीशीं धरण्याचा प्रयत्न केलास. तो तुला परका नाहीं. पण तूं मात्र त्याला अनोळखी वस्तु आहेस. त्याला आम्ही हिरावला नाहीं. तूं त्याला उपटून फेंकून दिलास. आम्ही तें रोप दुसरीकडे लावून वाढविलें. त्याच्या मुळया नव्या जमिनींत वाढल्या; आमचा काय त्यांत दोष आणि हें कसें झालें त्याला समजलें तर ! त्याचें मन तुझ्यापासून कायमचें परावृत्त होईल. "

तिनें अंग अंथरुणावर टाकलें. दोन्ही हातांनीं तोंड झांकून ती रडूं लागली.

" हाय कुमार, काय झालं हो हें ! "

नीलकंठ स्तब्ध बसले होते. तिचें समाधान करण्याचा प्रयत्न त्यांनीं केला नाहीं. बऱ्याच वेळानें ते म्हणाले,

" आईविना पोरक्या रामची अनास्था होईल म्हणून तूं परत आलीस. पण रामला तुझी आवश्यकता नाहीं हें तूं पाहिलेंसच. माझा भविष्यकाल तुझ्यांत संलग्न झाला होता. तथापि परस्त्रीवर आसक्ति ठेवण्याइतका मी नीच नाहीं. "

मुलाच्या मातेला परस्त्री म्हणतांना मनाला असह्य वेदना होतात. पण सत्याला पाठ देऊन कसें चालेल ? आणि सत्य हें असें कडू आहे.

या घरांत तुला जागा कोठें राहिली ? परस्त्री म्हणून तूं मला परकी.

रामला तुझी विस्मृति पडली; ज्यांच्यामुळें हें घर तुझें होतें, ज्यांच्यामुळें या घराची तूं मालकीण होतीस, त्यांच्यांत आणि तुझ्यांत उंच भिंती उभ्या राहिल्या. म्हणूनच या घरांत तुला स्थान नाहीं."

"मला परत पाठवायची होती तर बोलावलीत कशाला?"

"पुरुष अन्यायी असतात असें स्त्रियांना नेहमींच वाटतें. तुझ्या हातून चूक कशी झाली हें न पाहतां शिक्षा देणेंही मला योग्य वाटलें नाहीं. तुझ्याविरुद्ध मनांत जळणारी आग मी किती प्रयत्नांनीं विझविली तुला कल्पना नाहीं. रात्रींच्या रात्रीं मी विचारांत काढल्या. आपलीं मनें मिळालीं नाहींत ह्यांत माझाही दोष थोडा होताच. तुझ्या सहवासाला मी मुकतांच माझ्या जीवनांत तुझे धागे किती गुंतले होते याची मला कल्पना आली.

"माझ्या दोषाचा वांटा पुरेपुर उचलण्याची मीं तयारी केली. तुझा घरांतून निघून जाण्याचा अर्थ मला समजला नाहीं. परंतु तुझ्यावर अन्याय होऊं द्यायचा नाहीं हा मात्र निश्चय केला होता. म्हणून तूं येण्याची इच्छा दर्शवितांच मीं तुझें स्वागत केलें.

"तुला घरांत कोणी अपशब्द बोलूं नये म्हणून ताकीद दिली. हें घर तुझें असतें तर तुला येथें कसलाही त्रास झाला नसता."

"पण मी आतां कोठें जाऊं? कुमारकडे मला कसें परततां येईल? आम्हीं पतिपत्नी आहोंत अशी सर्वांची कल्पना आहे. तेथें माझी कुचंबणा होईल."

विचाराच्या धगीनें तिचे अश्रु पार सुकले होते. तिच्या आवाजाला तीव्रता आली होती.

"तूं ज्या चुका केल्यास त्यांचे परिणाम तुलाच भोगणें भाग आहे. तुझ्या चुकांना आम्हीं दोघे, मी व कुमार बळी पडलों. आमचा विचार कधीं केलास का? दोन सुखाचे संसार तूं मोडलेस.

'ह्याचीच बायको पळून गेली होती,' लोक बोटें दाखवून म्हणतात; सासु फार खाष्ट असल्याच्या अनेक वदंता आहेत. माझ्याबद्दलही अनेक दंतकथा पसरल्या आहेत. शिवाय आतां पुन्हां संसारांत पाऊल टाकणें किती कठिण केलेंस तूं मला? माझ्या मनाला एक कायमची जखम झाली. फिरून भागीदार शोधतांना मला केवढी काळजी घ्यावी लागेल? एकदां ठेंच लागली म्हणजे ती जागा अधु होऊन बसते. शिवाय रामला सापत्न मातेच्या स्वाधीन करतांना मनाला केवढी भीति वाटेल!"

आपण घरांत असतांनाच दुसऱ्या लग्नाची भाषा तिला कटु वाटली.

"आणि कुमारचें जीवन हेंच! कायद्यानें आपली गांठ कायमची पडली. तूं त्यांची होणें आतां शक्य नाहीं. समाजाच्या नीतिकल्पना थोड्याशा कायद्याच्या कक्षेंत फिरतात. परक्या परदेशांत जोंवर तुम्हांला कोणी ओळखणारें नाहीं तोंवर ठीक. पण तुला कोणी ओळखतांच एकदम म्हणेल.

'यांनीं हिला पळवून आणली.'

आणि जी मानहानि होईल ती त्यांना सोसावी लागेल.

......आणि तूं? तूं घरांत बसून रडशील. मी अभागिनी आहे म्हणशील, आपल्या दैवाला दोष देशील."

"हो, चूक माझीच आहे सारी. मी किशोरीचें म्हणणें ऐकलें असतें तर हा प्रसंग न येता. आतां पाण्यांत पडल्यावर काय? येईल तसें पोहावें, नाहीं तर बुडून मरावें एवढाच उपाय."

"तुला समाजाला तोंड दिलें पाहिजे तरच तुझा तरणोपाय आहे. जन्मभर तुला जळावें लागेलच. रामला तुझी जरूर नाहीं, तो मला अत्यंत प्रिय आहे. त्याची चिंता तूं करूं नकोस. मुलांचें प्रतिपालन करणें हा मातेचा धर्म खरा. तथापि प्रत्येक धर्माला मर्यादा असतात. ज्या घरांत मातापितरांच्या बाहूंचा पाळणा मुलांसाठीं हालत नाहीं तें घर

नव्हे, महारवाडा होय. अशा वेळीं दूर सरून मुलांचें संगोपन दुसऱ्यांना करूं देणें हेंच मुलांना हितावह असतें.

" माझ्या म्हणण्याचा पूर्ण विचार कर. रामचें भविष्य मी तुझ्या हातीं सोंपविणार नाहीं हें निश्चित. सगळ्या गोष्टी लक्षांत घेऊन जें करायचें असेल तें कर. माझ्या घरांत मैत्रीण, पाहुणी या नात्यानें तुला योग्य वाटेल तेंवर रहा. तूं आत्मयज्ञ करून कर्तव्य करणार असलीस तरी मला त्याचा हविर्भाग नको आहे. तुला स्पर्श करण्याचें पाप मी कधींहि करणार नाहीं......."

# तराजूंत

" वा पंडितजी, हा वाद नाहीं, वितंडवाद आहे. प्रतिपक्षावर मात करतां आली नाहीं म्हणजे त्याला म्हणायचें ' तुमच्यांत नी पशूंत काय अंतर ? ' पण मी म्हणतच नाहीं आम्ही पशूंच्या पेक्षां श्रेष्ठ आहोंत असें; कांहीं बाबतींत तर आम्ही कनिष्ठ आहोंतच."

" पशूपेक्षां मानव कनिष्ठ ? हीं घरें, हीं वस्त्रप्रावरणें, शास्त्रें, धर्म— पशूंजवळ काय आहे ह्यांपैकीं ? "

" नसेल कांहीं. पण पशूचें स्वातंत्र्य हरण करा. तो आप्राणांत लढेल; त्याला बंदिवान करा तो सुटण्याची धडपड करील. तुम्ही माणसें आहां. तुम्हांला गुलामगिरीच्या बेड्या तोडाव्याशा वाटतात कधीं ? तुमचीं भातुकलीमधलीं घरें. त्यांत आळ्याप्रमाणें बुजबुजणारे तुम्ही। "

" नेसूनचें सोडून तुम्ही डोक्याला गुंडाळतां. तुम्हांला काय म्हणावें ? धर्म व राजकारण एकाच तागडींत तोलतां. धर्म नष्ट झाल्याची तुम्हांला पर्वा नाहीं. तुम्ही नास्तिक बनत चाललां आहांत. "

" हें पहा. धर्म म्हणजे परमेश्वरपूजा नव्हे. धारणेला मदत करणारा तो धर्म, अशी व्याख्या तुम्हीच करतां. आजच्या समाजाला तेहतीस कोटि देवांची जरूर नाहीं. आम्ही त्यांना हद्दपार केलें. सुशिक्षित वर्गाला ह्या सैन्याच्या सेनापतीची आवश्यकता नाहीं. ते निरीश्वरवादी बनतील. त्यासाठीं एवढा त्रागा कां ? "

" तुम्हांला समाजाची उलथापालथ करायची आहे. तुमच्या वर्गांत

स्पृश्य विद्यार्थी अस्पृश्यांमध्यें मिसळतात. आज रोटीव्यवहार सुरू झाला, उद्यां बेटीव्यवहार सुरू होईल. सगळी आर्यसंस्कृति रसातळाला नेण्याचे उद्योग आहेत हे. ''

"पण तुम्ही आहां तिचे आधारस्तंभ ! तुम्ही लोपलेल्या चातुर्वर्ण्याचा उद्धार करा कीं. पाण्यावर आलेली लाट लयाला जाते. कारण तिच्यांतील शक्ति नष्ट होते. आर्यसंस्कृतीवर अशा अनेक लाटा येऊन गेल्या. त्या तुम्हांला फिरून आणतां येतील, ही कल्पना फोल आहे. तुम्हां लोकांनाही त्याची जाणीव आहे. परंतु घरबसल्या मोठेपणा मिळावा म्हणून तुम्ही स्वतःच्या ज्ञानाची टिमकी वाजवतां. "

राधा हलक्या पावलानें येऊन ऐकत होती. आज सहा महिन्यांनीं ती परतली, तों कुमार अंतर्बाह्य बदलले होते. वैद्यजींचें घर सोडून त्यांनीं गांवाबाहेर एक कुटी बांधली होती. बेकार हिंडणाऱ्या तरुणांना खेड्यापाड्यांतून काम करणें सुलभ जावें म्हणून एक वर्ग सुरू केला होता.

"बापाच्या जिवावर जगण्यापेक्षां खेडुतांना शक्य ती मदत करा व मोबदला मीठभाकरी मिळवा. तुम्हांला चांगली नोकरी मिळाली तर हें काम सोडा." ते म्हणत.

कुमारच्या अनेक गोष्टी ग्रामस्थांना पसंत नव्हत्या. ते सावकारांच्या विरुद्ध खेडुतांना मदत देत. पतपेढ्या सुरू करण्याचा त्यांचा प्रयत्न होता. सामाजिक अन्याय दूर करण्याची त्यांची धडपड होती. आणि ह्या साऱ्या गोष्टी न पटल्यानें ग्रामस्थांशीं त्यांचे खटके उडत.

राधा आली तेव्हां ते असेच एका वृद्ध शास्त्र्यांशीं बोलत होते. राधा मागच्या दारानें कुटींत आली. एक वृद्धा स्वयंपाक करीत होती. तिला राधा परिचित होती.

" ओहो ! बहू तो बहुत दिनबाद आयी. बैठो बेटा." तिला पाट देत ती म्हणाली. राधा कुडाच्या बिन भरलेल्या भिंतींतून बाहेरचा संवाद ऐकूं लागली.

× × ×

' मी कुमारना विसरेन ' राधेनें नीळकंठांना आश्वासन दिलें. ' हा तुझा प्रश्न आहे ' ते हंसून म्हणाले. रामला लळा लावायचा नाहीं या कबुलीवर ती तेथें राहिली. तिनें एक दोनदां 'आत्मार्पण' करण्याचा प्रयत्न केला. पण नीळकंठांनीं प्रथमच ' हविर्भाव ' नाकारला होता. त्यांना ' यज्ञ ' नको होते.

जी. आय. पी. रेल्वेवर प्रचंड संप होऊं घातला होता. नीळकंठ त्याची संघटना करण्यांत बुडले होते. तेथेंच त्यांची व गिरिजेची ओळख झाली. एक विचार, एक आचार व सारखा सहवास यामुळें त्यांनीं विवाहबद्ध होण्याचें ठरविलें. साहजिकच राधेला घर सोडणें भाग पडलें.

× × ×

शास्त्रीबुवा गेले व कुमार जेवावयास आंत आले. राधा स्नानाला गेली होती. वृद्धेनें त्यांचें पान वाढलें.

" बेटा, उद्यांपासून तूं माझ्या हातचें थोडाच जेवशील " ती जरा खिन्नतेनें म्हणाली.

" कां बरें माँ ? "

" तुझी बायको आली आतां ! "

" माझी बायको ? केव्हां ? " तो चकित झाला.

" आतांच. स्नान करते आहे. "

उद्वेगाची छटा त्यांच्या चेहऱ्यावर आली. त्यांना जेवण गेलें नाहीं. ते हात धुवून अंगांत बंगाली सदरा व डोक्याला टोपी घालून बाहेर गेले.

राधेनें त्यांचा आवाज ऐकला होता; तिचें हृदय थरारलें. ती घाईनें स्नान आटोपून घरांत आली. पण कुमार केव्हांच गेले होते. तिची निराशा झाली.

" बेटी, पतीला टाकून स्त्रीनें इतके दिवस माहेरीं जाणें बरें नव्हे. तूं त्याची इतकी सेवा केलीस आणि तो जरा बरा होतांच सहा महिने

माहेरीं जाऊन राहिलीस. तुझ्यामागें तो पुन्हां वेडा होण्याच्या मार्गाला होता.

" वैद्यजींनीं किती समजूत घातली. आतां मन रिझवायला हा संन्यास घेतला आहे त्यानें. तुळशीदास आहे दुसरा. आतां तुझ्यावर रुसूनच बाहेर गेला आहे. " म्हातारी हंसून म्हणाली.

तिच्या आग्रहानें राधेनें दोन घांस खाल्ले, पण तिचें तिकडे लक्ष नव्हतें. क्षणाक्षणाला ती कुमारच्या आगमनाची अपेक्षा करीत होती. कुमार आपली उपेक्षा करूं शकणार नाहीं असा तिला विश्वास होता. वृद्धा आपल्या घरीं गेली. राधा एकटीच कपाळावर हात देऊन विचार करीत बसली होती. बाहेर निंबाच्या झाडाखालीं विद्यार्थी एकत्र झाले होते. थोड्याच वेळांत कुमारही परत आले; पण घरांत गेले नाहींत. त्यांनीं वर्ग घ्यावयास सुरवात केली. त्यांचे शब्द राधेला ऐकूं येत नव्हते; पण त्यांचा आवाज मात्र तृषार्त चातकाप्रमाणें ती पीत होती.

तिचें मन पुष्कळ शांत झालें. प्रवासानें ती थकली होती. जमिनी-वरच ती झोंपी गेली.

रात्रीं आठ वाजून गेले होते. तरी कुमार बाहेरच होते. कार्तिक संपत आल्यानें थंडीचा कडाखा वाढत होता. वृद्धेनें स्वयंपाक करून झांकून ठेवला.

" मी जातें. ' लडका ' आला म्हणजे त्याला गरम करून वाढ. त्याला थंड अन्न आवडत नाहीं. " ती जरा हंसली " काय वेडी मी ! तुला कां त्याचा स्वभाव माहीत नाहीं ? "

वृद्धा निघाली. जातांना राधेचें मस्तक अवघ्राण करून तिला आशी-र्वाद द्यावयास गेली. राधा खिन्नपणें बसली होती. तिच्या नेत्रांतून अश्रू पाझरत होते.

" बहू काय हें ! भरल्या घरांत रडूं नये बेटी ! आज इतक्या दिव-

सांनीं घरीं आलीस. घरची ज्योत पाजळली. उठ. कपडे बदल. भांग भर " सुवासिनींना भांगांत शेंदूर भरण्याची इकडची रीत.

" लडका येईल. तुझें खिन्न मुख पाहून त्याचें मन प्रसन्न होईल कां ? जरासा रुसला म्हणून मनाला इतकें लावून घेतेस ? शिवाय चूक तुझी आहे......पुरुषांची जात आहे. रागावला असेल. क्षमा माग म्हणजे झालें. पदर पसरण्याची लाज स्त्रियांना ग कसली ? "

राधेला हुंदका आला. वृद्धेचें हृदय कळवळें. तिनें राधेला हातीं धरून उठवलें. राधा तोंड धुवून आली व तिनें कपडे बदलले.

" हेंच का लुगडें नेसणार तूं ? पाहूं...हात्तेच्या. तुला साड्यासुद्धां चांगल्या घेत नाहीं हा ! पुरुषांना ह्यांत कांहीं गम्य नसतें. "

वृद्धेच्या आग्रहानें राधा मागच्या खोलींत केशरचना करीत होती. इतक्यांत कुमार आले.

" बेटा, मी आतां जातें. रात्र झाली. बहू वाढील तुला."

कुमार अनेकदां हातांनीं वाढून घेत, पण आज राधेसह एकांत त्यांना नको होता.

" मा, तूं जेवायला घाल तर जेवेन मी. " म्हातारी हंसली. तिनें विस्तव सरसावला व त्याचें पान वाढलें.

" बेटा तूं इतका कां रुसला आहेस ? चूक झाली तिची, म्हणून काय झालें ? पुरुषांनीं इतका कठोरपणा नये करूं."

" कोण म्हणतो मी रुसलों आहे ? "

" सकाळपासून तिच्याशीं शब्द तरी बोललास ? मला नाहीं वाटत. पोरीचा चेहरा पार उतरला आहे.

निदान तिनें केलेली तुझी सेवा ध्यानांत घे. आई मुलाची शुश्रूषा इतका जीव लावून करणार नाहीं."

कुमारच्या मुखावर उमटलेल्या रोषरेषा क्षणभर मावळल्या.

"मा, तिच्या स्वार्थत्यागाची कदर मला आहे. तूं निःशंक मनानें जा. तुझ्यासारखी पाठीराखी तुझ्या बहूला मिळाली. मग काय ?"

कुमारचें जेवण झालें. राधेचें पान वाढून वृद्धा गेली. कुमारनीं वृद्धेला आश्वासन दिलें, तरी त्यांचें मन स्वच्छ नव्हतें. बाहेरच्या खोलींत जाऊन ते दिव्याशीं पुस्तक चाळीत होते. राधेनें अश्रूंच्या घोटाशीं चार घांस पोटांत ढकलले. प्रत्येक घांस तिच्या घशांत अडकत होता. अखेर पान बाजूला सारून ती उठली.

बाहेर सोसाटयाचा वारा सुरू झाला होता. कुडाच्या भिंतींतून वारा आंत येऊन हुडहुडी भरत होती. राधा हात धुवून कुमारच्या खोलींत शेगडी जळत होती तेथें आली. कुमारनें वर मान उचलली नाहीं.

राधेनें सुटकेचा निःश्वास टाकला. वृद्धेनें आग्रह केल्यानें तिनें शृंगार केला, पण त्याचें शल्य तिच्या हृदयांत खोल जाऊन भिनलें. अजून 'आत्मार्पण' करण्याची तिच्या मनाची तयारी नव्हती. कुमारच्या इच्छेविरुद्ध जाण्याइतका ताठरपणाही तिच्यांत उरला नव्हता. जें येईल त्याला मान तुकविण्याची तयारी तिनें केली होती; म्हणूनच...... म्हणूनच कुमारच्या उपेक्षेनें तिच्या हृदयाला जखम केली, पण मलमही लावलें.

......कुमार आपल्याकडे पहातील ही आशा आणि भीतीही तिच्या मनांत घर करून होती. कुमारची अस्वस्थता तिच्या नजरेंतून सुटली नाहीं. त्यांचें लक्ष पुस्तकांत नव्हतें. तेंच पान त्यांना तीनदां चाळावें लागत होतें. मध्येंच ते निःश्वास टाकीत. केव्हांतरी कपाळा-वरून हात फिरवीत. असा किती वेळ गेला कोण जाणे !

दोनचार शेतकरी रोज कुटीच्या आश्रयाला रात्रीं येत. ते येतांच कुमारनीं एकाला सांगितलें.

"बाईला पलीकडच्या खोलींत अंथरूण घालून दे."

राधा जाऊन अंथरुणावर पडली. दुपारीं पुष्कळ झोंप काढल्यानें तिला झोंप येईना. तिला अजूनही वाटत होतें 'कुमार आपल्याशीं दोन शब्द बोलतील.'

कुमार बाहेर वाचीत होते. वाट पाहून तिचीं गात्रें थकलीं. तिचे डोळे मिटले. तिला स्वप्नांतही कुमार दिसत होते. ते तिच्या केसावरून हात फिरवीत होते.

# कुठें ?

...राधा जेवून आली. कुमार विचारमग्न दिव्याशीं बसले होते. त्यांच्या हातांत पेन्सिल होती. मधून मधून ते कांहीं आंकडेमोड करीत. 'भिकाऱ्यांचा रोग' कसा नाहींसा करावा हा प्रश्न ते सोडवीत होते. कुठेंही जा. ''बाबा, भूखा हूं. एक पैसा दो' हा आवाज कानीं येतोच. कुमारला त्यांची कींव येई. खिशांत पैसा असेल तर ते देऊन टाकीत. कित्येकदां त्यांची फसगत होई. अनेक भिकारी चांगले गब्बर असल्याचें त्यांना आढळून आलें.

" भीक सर्वांनाच मिळूं शकत नाहीं. दान पुष्कळ होतें पण बहुतेक सारें अपात्रीं. कारण, भीक मागणें हा धंदा आणि कलाही आहे. ज्याला ही कला अवगत झाली तो भिक्षाधीश कसला लक्षाधीश होतो. ज्यांना हात पसरतां येत नाहीं, तोंड वेंगाडतां येत नाहीं असे खरे गरजू मात्र उपाशीं मरतात.

" हें दान सत्पात्रीं पडण्यासाठीं काय करावें ? दरसाल कर गोळा करून भीक मागणें बेकायदा ठरवलें तर ? पण कर सर्वांवर सारखा पडतो. भिक्षा दयेची–स्वच्छेनें ! दारांतल्या भिक्षेकऱ्याला शिळा तुकडा, फाटका कपडा सर्व चालतें. कर पैशांत भरावा लागून गरिबांवर त्याचा बोजा पडेल.

...आणि कर किती गोळा करायचा ? भिकाऱ्यांची संख्या साधारण किती असेल ? ह्या निरुद्योग्यांना काय काम देण्यांत यावें ? ज्यांचा बक-

लोपार्जित धंदाच भिक्षेचा असे फकीर, बैरागी, गोसावी, यांचें काय करतां येईल ? धर्मभोळी जनता यांच्या बाजूनें उठेल काय ? "

राधा आली तेव्हां कुमारच्या डोक्यांत हेच विचार घोळत होते. नगरसभेनें कर गोळा करावा. त्यांतून उद्योगधंदे काढून अनाथ, अपंग, बेकार ह्यांना मदत द्यावी, हेंच शक्य आहे; असें त्यांना वाटत होतें. आणि मांजराच्या गळयांत ही घंटा अडकवण्याचा प्रयत्न करण्याचा त्यांचा विचार होता. तेवढयासाठीं आपल्या कल्पना स्पष्टपणें मांडण्याचा ते प्रयत्न करीत होते.

राधेला परत येऊन आज आठ दिवस झाले होते. परंतु तेवढ्यांत दोघेंही परक्याप्रमाणें वागत होतीं. कामापुरतें कुमार तिच्याशीं बोलत—त्यांचा अबोला नव्हता इतकेंच. दोघांची ' दिलजमाई ' झाली नाहीं हें वृद्धेला समजून चुकलें होतें. पण ' नवरा बायको ' च्या मध्यें तिऱ्हाइतानें हात कुठवर घालायचा ? या विचारानें ती गप होती.

राधेला करमत नसे. दोन्ही दगडीवर पाय देऊन ती अखेर दरींत पडली. नीलकंठ व कुमार दोघांच्या पदरांतून सुटून ती खालीं आदळली. दिवसा ती कुमारच्या विद्यार्थ्यांबरोबर वर्गांत बसे. कुमारचा शिकवण्यांत हातखंडा होता.

" खेड्यापाड्यांत जातांना एक गोष्ट विशेष लक्षांत ठेवा कीं, तुमचें काम सेवा करण्याचें आहे. गरीब, खेडुत, हीं तुमच्या हातांतलीं खेळणीं नव्हत. तुमचें ध्येय साध्य होण्यासाठीं तुम्ही त्यांचा उपयोग करून घेऊं नका. त्यांच्यावर उपकार करण्याची मनीषा सोडून द्या. खेड्यांत शिरून त्या गरीब जनतेशीं समरस व्हा. त्यांचीं सुखदुःखें त्यांच्या नजरेनें पहा. त्यावरती उपाय योजना करतांना मात्र स्वतःची आरशी वापरा, तरच त्यांच्या जखमा तुम्हांला भरतां येतील. जोंपर्यंत तीं माणसें आहेत हें तुम्हांला पटत नाहीं तोंवर तुमच्या हातून खरी सेवा होणें शक्य नाहीं. परीक्षेसाठीं अभ्यास करणारा विद्यार्थी ज्ञानाला मुकतो हें विसरूं नका...... "

अनेक सामाजिक चालीरीतींनीं गरीब लोक गांजलेले आहेत. त्या बद्दल त्यांना दोष देऊं नका. त्यांना नवा मार्ग दाखवा. ते अत्यंत श्रद्धाळू आहेत. भुतेंखेतें, शेंदूर फांसलेले देव, सर्वांच्या पुढें ते नमतात. त्यांची टवाळी करून फायदा होणार नाहीं...."

वर्गांत बसलेल्या राधेला ह्या गोष्टी दूर–दूर-मंगळावर घडणाऱ्या वाटत. वेळ जावा म्हणून वर्गांत बसत असे ती. अनेकदां तिला वाटे.

" खेडवळ दूर राहिले. पण मध्यम वर्गाला त्यांतल्या अनेक गोष्टी पटत नाहींत. "

तिच्या विचारांचें क्षितिज विस्तीर्ण नव्हतें. त्यामुळें तिला ह्या उच्च विचारांनीं आनंद होईना. जुना कोळसा ती फिरून उगाळूं लागे. तिच्या डोळ्यांतून अश्रु गळत.

" कोण पुसणार माझे अश्रु ? मीच ! ' हा एकांतांतला अश्रु गालावरच वाळायचा. ' तिनें कधींसें वाचलें होतें. पंचविशी उलटण्यापूर्वींच आयुष्याचा खेळ संपून हातीं काय आलें ? एकांत—कधीं न संपणारा भीषण एकांत ! आणि अश्रु—न पुसल्यामुळें गालावरच वाळणारा अश्रु ! ! "

तिचें हृदयाकाश फिरून भरून येई, व सरीवर सरी कोसळूं लागत ती किंकर्तव्यमूढ झाली होती. अनेकदां तिला वाटे कुमारना स्पष्ट काय. तें विचारावें. पण कुमारच्या दर्शनानें तिची जीभ टाळ्याला चिकटून बसे. शरीर रोमांचित होई. एकदां कुमारचा स्पर्श तिला चुकून झाला. तिच्या शरीरांतून एक लाट गेली. स्वप्नांतील माणसाप्रमाणें ती तेथेंच उभी राहिली.

....ती आंत आली. तिचे विचार कुमारबद्दलच होते. आपल्या मनाविरुद्ध ती पुढें सरकत होती. ती कुमारच्या निकट येऊन उभी राहिली. तिची समीपता कुमारना जाणवली. तिचा श्वास त्यांच्या अंगावरून गेला. त्यांची देहलता फुलांनीं उंबरली. पण भावनेविरुद्ध ते

अजूनही झगडत होते. आपला खालचा ओंठ त्यांनीं कडकडून चावला. दूध उतूं आलें होतें. आपल्या इच्छेविरुद्ध त्यांनीं तिच्याकडे मान उचलून पाहिलें. तिच्या डोळ्यांत आंसवें भरलीं होतीं.

त्यांना मनस्वी चीड आली. पण ती व्यक्त मात्र त्यांच्यानें झाली नाहीं. तिच्या अश्रूंकडे दुर्लक्ष करीत ते म्हणाले.

" राणी, खालीं बस ना ! " आज आठ दिवसांत नकळत त्यांनीं राणी हें संबोधन वापरलें होतें.

ती खालीं बसली. तिनें डोळे पुसले. कुमारना मोह झाला, तिच्या गालावर ओघळलेले प्रेमजल हलक्या हातीं टिपावें, पण कष्टानें त्यांनीं तो मोह आंवरला. राधेनें रुद्र स्वरानें विचारलें.

" मी येथें राहूं नये, अशी आपली इच्छा आहे ? "

" माझ्या इच्छेचा काय प्रश्न आहे ? तू माझ्या इच्छेनें येथून गेली नाहींस. तुला येथें रहावेंसें वाटेल तोंवर घर तुझें आहे. "

" तुम्हाला माझ्या जाण्या- रहाण्याची परवा नाहीं असेंच ना !

' असली तरी काय उपयोग ? '

" कुमार, असे परक्यासारखे बोलूं नका. मला तुमच्याशिवाय आतां कोणाचा आधार आहे ? "

" का बरें ? " कुमारनें उपरोधिकपणें विचारलें.

" मी आपल्या घरीं गृहिणी ह्या नात्यानें राहूं शकत नाहीं. माझा मुलगा मला कधींच विसरला. त्याला माझी जरूर नाहीं; अगर त्याला माझ्यावर सोंपवण्याची त्याच्या वडिलांची इच्छा नाहीं..."

" असें ! म्हणून तूं परत आलीस. आम्ही सारीं तुझीं खेळणीं आहों. तीं दोन तुझ्या हातून गेलीं. पण मी तर तुझ्या सत्तेचा आहे ना ! " कुमारच्या शब्दांचा उपरोध व तीव्रता राधेला समजली.

" कुमार, कुमार ! मला तुमच्यावांचून कोणाचा आधार आतां नाहीं. त्यांनीं दुसरें लग्न केलें. "

"मी मांडव नव्हे, वर वेल चढवायला. मी संसारांत सखी शोधीत होतों—लतिका नव्हे. कदाचित लतेच्या भारानें माझा पुरुषार्थ पूर्वी जागला असता; आणि मी सुखी झालों असतों. आज माझी दृष्टी बदलली आहे. तुझ्या नशिबाशीं–आणि दुबळेपणाची तात स्वतःच्या गळ्याला लावून घेण्याची इच्छा नाहीं."

"ह्या सगळ्याचा अर्थ एकच होतो कुमार. मी इथें रहावें, असें तुम्हांला वाटत नाहीं. मी राहिलें तर तुमची हरकत नाहीं. पण तेवढ्यावर जीवनाचीं मुळें कशीं जगायचीं ? माणसाला प्रेम व सहानुभूति ह्यांची आवश्यकता असते. पोटाला गोळाभर अन्न खाऊन, मी येथें कुठवर पडून राहूं ? केवळ सहा महिन्यांत सारें जग उलटें फिरेल, असें वाटलें नव्हतें मला."

"थोडी विचारशक्ति तुला असती तर ? तुझ्यासाठीं मी एकदां वेडा झालों होतों. फिरून तूं गेलीस कायमची म्हणून अशा वेळीं तुला विसरण्याचा प्रयत्न आत्मरक्षणासाठीं करणें मला भाग होतें. तें मी यशस्वी रीतीनें पार पाडलें, म्हण हवी तर."

"कुमार माझी चूक झाली. मी परत जायला नको होतें. पण त्या चुकीबद्दल फार मोठी शिक्षा आहे ही."

"तुझ्या थोड्याशा चुकीमुळें मी वेडा झालों असतों. तुझें मन हिंदोळ्यावर झोके खातें. तुझ्या हातांत माझें भविष्य देण्याची चूक मी कशी करीन ? माझें मन अजून तुझ्याकडे ओढतें. त्याचें नियंत्रण मला केलें पाहिजे. मुलांसाठीं तूं मला टाकून गेलीस. मागें माझें काय होईल, ह्याचा विचार केला होतास ? तुझ्या जीवनांत माझें जीवन मी जगत होतों. एका हिसक्यासरशीं निर्दयपणें तूं मला तोडून टाकलेंस; माझें आयुष्य निर्हेतुक–व्यर्थ केलेंस. माझ्या जिवाची काहिली होऊं लागली. रात्रंदिवस आंतून उंदीर लागला होता जसा !

माझ्याबद्दल सहानुभूति कोणालाच नव्हती. सर्वांना वाटे.

" काय बाइलवेडा मनुष्य आहे हा ? बायको चार दिवस माहेरीं गेली–तर राहवत नाहीं. "

माझ्या वेड्या मनाचे विचार मारण्यासाठीं मी इतर कामांत त्याला गुंतवलें. माझी जीवनशक्ति तिकडे लावली. आतां मला मोह घालून परत कां आणतेस ?

उद्यां पुन्हा तूं मला सोडून गेलीस,–मला फिरून त्याच दिव्यांतून जावें लागेल. त्यापेक्षा निष्प्रेम पण जिवंत आयुष्य जगणें, मला फार श्रेयस्कर वाटतें. तूं मला ह्या नसत्या मोहांत घालूं नकोस. ज्या दिवशीं तूं येथून गलीस, त्या दिवशीं मला तू मेलीस, मी तुला मेलों. "

" कुमार, तुम्हाला गरिबांची इतकी करुणा येते, माझी नाहीं येत कां हो ? मला आपल्याजवळ ठेऊन नका घेऊं, पण मला विसरूं नका. मी कोणाकरितां जगूं ? कशाला जगूं ? "

" जगात कोणी कोणासाठीं जगत नाहीं. जीवन सौंदर्य परिपूर्ण आहे. त्या सौंदर्याचा उपभोग घेण्यासाठीं मानव जगतो. ऐंशी वर्षांच्या वृद्धा-पुढें मृत्यू उभा राहिला तरी तो म्हणतो.

' अजून थोडें जगूं दे ! '

तुला माझ्या प्रेमाची जरूर भासते. त्यांत तुझा स्वार्थ आहे. जगाला एकाकी तोंड देण्याची कुंवत तुला नाहीं. खऱ्या प्रेमाचा आस्वाद तूं घेतला नाहींस.

खरें प्रेम अमृताइतकें मधुर आहे. तुझ्याहातीं तो पेला आला असतांना जगाच्या भीतीनें तूं त्याला ठोकर मारिलीस.

" राधा उठली. कुमारशीं जास्त बोलणें तिला व्यर्थ वाटलें. तिच्या मनांत विचार आला. ' एकादी विहीर कां जवळ करूं नये ? ' परंतु जीवाशी जिवट असते. जीव देण्याचा विचार सोपा, कृति मात्र भावना-वेशांतच होते. शांत मनानें आत्महत्या करणारी व्यक्ति विरळा. अशीं माणसें मात्र धाडसी—धैर्यसंपन्न खरीं !

...राधा अंथरुणावर पडली. तिच्या डोळ्यांत अश्रूं नव्हता. तिचें मस्तक भणभणत होतें. जीव देण्याचा धीर नसल्यानें जन्मदात्या मातेला ती बोल लावीत होती.

कुमारच्या हातांतून पेन्सिल केव्हांच गळून पडली. आज प्रथम त्यांना रडावेंसें वाटलें.

"राधा, जीवन ! राणी !! तिला मी आज टाकून बोललों. योग्य केलें कां मी ? प्रेमाच्या धाग्यावांचून आमच्या जीवनाचे मणि केरोवारीं जाणार आतां !"

# फुलें

थंडी वाढली होती, पण सुदैवानें वारा नसल्यानें खोलींत तितकीशी जाणवत नव्हती. विशेषतः खोलींत कोकची शेगडी जळत असल्यानें कुमारना थंडीचा कडाखा न जाणवतां, सुखद शीतलता प्रतीत होत होती.

कुमार जागे होते. त्यांना अस्वस्थ वाटत होतें. खोलींत फेऱ्या घालून थकल्यावर ते खिडकीशीं जाऊन उभे राहिले. उद्यां अमावास्या, रात्र त्यामुळें काळोखी. तारागण नभःप्रागणांत खेळत होता. बऱ्याच अंतरा-वर उन्हाळ्यात सुकणारा एक छोटासा तलाव होता. त्यांत तारकांचें सुंदर प्रतिबिंब पडलें होतें.

विमनस्कतेनें पुष्कळ वेळ कुमार तेथें उभे होते. नंतर पुनः त्यांनीं शतपावलीला सुरवात केली. पाय गळून आल्यावर ते अंथरुणावर बसले. रात्रीची घटना पुनः पुन्हा डोळ्यासमोरून धांवत होती.

.......कुमारनीं डोळे उघडले त्यांचा डोळा लागला असावा मध्यें! जागतांच त्यांना काय वाटलें कोण जाणें ते चटकन उठून बसले. भोंवतालीं सारा अंधेर होता. उशाशीं नेहमीं असणारा टॉर्च त्यांनीं लावला.

...खोलीच्या बाहेर चांगली थंडी होती. अंगावरची शाल त्यांनीं अंगाला घट्ट लपेटली. राधेच्या खोलीचें दार उघडून ते हलकेच आंत शिरले. राधा झोपेंत होती. तिच्या पापण्यांच्या केंसावर दोन मोती धरले होते.

कुमार जवळ आले. आपल्या धोतराच्या सोग्यानें त्यांनीं तिचे अश्रू पुसले. त्यांचा ऊष्ण श्वास तिला तात्काळ जाणवला. तिनें डोळे उघडले.

त्यांचें आगमन तिला अपेक्षित होतें जणूं. तिची देहलता वाऱ्याच्या मंद झुळुकेनें थरारली. तिला भारल्याप्रमाणें वाटलें. मोठ्या कष्टानें ती बिछान्याच्या कडेला सरली. ही जागा कुमारसाठीं असल्याचें तिनें त्यांना हातानें खुणावलें. कुमार खालीं बसले. त्यांनीं तिच्या केसावरून हात फिरविला.

" जीवन ! जीवन ! ! " त्यांचा स्वर रुद्ध होता. राधा बोलली नाहीं. ती दचकली. कुमार कां आले, ह्याची तिची मीमांसा निराळी होती. पण कुमारचें स्वप्न निराळें असल्याचें त्यांच्या आवाजानें स्पष्ट सांगितलें.

" जीवन तुला माझा राग आला ना ? मी फार निष्ठुरपणें तुला बोललों. मला क्षमा कर बरं कां ? "

" कुमार तुम्ही माझ्यावर दया करायला आला आहांत कां ? "

" नाहीं. माझ्या सुकलेल्या जीवनवेलीला जीवन द्यायला आलों राणी. एकाकी जीवन किती कठोर असतें ! दिवसभर कामांत जीव रमतो. पण संध्याकाळचा संध्याराग हें चंद्रबळ टिकू देत नाहीं. दृश्य जगाच्या सीमा मर्यादित होत जाऊन अखेर स्वतःच्या हृदयांत विलीन होतात. ही अंतर्मुख दृष्टी एकांताला घाबरते आणि समान धर्मी हृदय शोधूं लागते.

राधे इतर सर्व गोष्टींत तूं व मी एकमेकांपासून अनेक योजनें दूर आहोंत. परंतु आपलीं हृदये एकमेकांना ओळखतात. संकटाच्या काळो-खांत माझ्या हातांत तूं आपला हात दिलास. माझें वेडें मन अजून हें विसरूं शकत नाहीं.

ही जाणीव माझ्या हृदयानें मला फिरून दिली. त्याच्या हांकेला जागूनच मी तुजजवळ आलों. माझ्या येण्यांत स्वार्थ आहे, त्याग नाहीं."

" कुमार तुम्ही मला यापुढें कधीं सोडणार नाहीं ना ? "

" राणी, आयुष्यांत माझा हात मी कधीं मागें घेतला का ? रूढि-संस्कारांमुळें तूंच माझ्यापासून दूर गेलीस. पाटाच पाणी तुला आवडतें. निर्झराचा खळखळाट तुला रुचत नाहीं.

राधेनें कुमारच्या गळ्यांत आपले हात अडकवले आणि हलक्या हातानें त्यांना जवळ ओढून आपली भावना व्यक्त केली. कुमार स्तब्ध बसले होते. त्यांचा हात तिच्या केंसावरून फिरत होता.

" राधे ! तुझ्याशीं गंभीरपणें बोलण्याची माझी इच्छा आहे. माझें म्हणणें ऐकून घेऊन सावकाशीनें विचार कर. " ते गंभीरपणें म्हणाले.

" राधे, तूं मला प्रिय आहेस. म्हणून तुझे गुणदोष माझ्या परिचयाचे आहेत. माझें प्रेम आंधळें नाहीं.—डोळस आहे. परंतु राधा मला त्या दोघांसह प्रिय आहे.

"......तुझ्यावर जगानें शिक्का मारला आहे. तुझें मन निर्भय नाहीं. जगांत ज्याला जिवंत जिणें जगायचें असेल त्याला बेदरकार व्हावें लागतें. जगाचे वाग्बाण हृदयाच्या ढालीवर हंसत झेलावे लागतात.

"......तुला स्वातंत्र्याची जरूर कधीं भासली नाहीं. ' जन्मली—जगली—प्रजोत्पादन केलें—मेली ' हाच तुझा इतिहास. निदान निसर्गाची इच्छा तरी तशी होती. तुझ्या शरीरांत कणा कोठें नाहींच. त्याच्या अभावीं स्वतःचा तोल तुला दुसऱ्याच्या आधारानें संभाळावा लागतो.

"......तूं परत गेलीस तेव्हां मला मरणप्राय दुःख झालें; पण मला आशा होती कीं तूं फिरून पाटाच्या पाण्यांत मिसळशील. नीलकंठ द्वितीय विवाह न करते तर तें शक्यही होतें.

"......तुला स्वतःची विचारशक्ति नाहीं व म्हणून तत्त्वेंही नाहींत. कांहीं अंशीं भाग्यवान् आहेस. ' तिटकारा ' ' किळस ' हे शब्द तुझ्या कोशांत नाहींतच त्यामुळें !

"......आज नव्या प्रांतांत पाऊल टाकते आहेस. रूढिसंस्कारांचे पाटबंधारे इथें नाहींत. नैसर्गिक शक्तीमुळें जिकडे पाणी आकर्षित होईल तिकडे वाहील. नीलकंठांचाचा आधार तुटला; तूं माझ्या अंगावर झेंप टाकलीस परंतु हा विषवृक्ष हें तुला निश्चित पटलें आहे काय ?" कुमार थांबले.

" मला विचार नाहीं करतां येत फारसा. गेल्या सहा महिन्यांत मी डोक्याला खूप ताण दिला. तुम्हीं घातलेलें कोडें त्यांनींसुद्धां माझ्यापुढें टाकलें होतें.

" मी तुम्हांला खरोखर सांगतें मला अजून सत्यासत्याचा निर्णय होत नाहीं. तुमचा माझा संसार त्यांनाही नैसर्गिक वाटला. परंतु माझें मन संस्कारांनीं भारलेलें आहे. मित्र या नात्यानें तुम्हीं मला परिचित आहांत. माझ्या मनांत निसर्गानें पेटविलेली ज्योत विझली नाहीं. तिला पुरेशी हवा न मिळाल्यानें ती विझल्यासारखी वाटते. मी जर विवाहित नसतें तर आपल्या आयुष्याचें उपवन केलें असतें. पण–पण आतां काय?"

तिच्या भावनासागराला भरती आली. ती कळवळून म्हणाली,

" कुमार ! कुमार !! आपल्यामध्यें हा अथांग सागर पसरला आहे. हें अंतर कधींच कापतां येणार नाहीं. "

" राधाराणी ! ही निराशेची भाषा विसर. प्रेम ही जीवनाची एक बाजू आहे. तीमुळें आयुष्याला सौंदर्य येतें पण तिच्याविना मनुष्य जगूं शकतो. निराशा मात्र सर्वव्यापी असते. ही कीड एकदां मुळांना लागली म्हणजे सारा खेळ खलास राधे ! निराशेच्या रडव्या गोष्टी बोलायला मला वेळ नाहीं. तुला विसरण्यासाठीं मी अनेक व्याप निर्माण केले. हळुहळु मला या जीवनाबद्दल भक्ति वाटूं लागली आहे. हा मार्ग कंटकमय आहे. केव्हां कोठें खड्डा येईल कोण जाणें ! सहकाऱ्याच्या हातांत हात घालून पुढें जावें हेंच माझें ध्येय. लहान गोष्टीसाठीं रडून आत्मशक्ति क्षीण करण्याची माझी इच्छा नाहीं. तुला जें देतां येईल तें मला दे. जास्त मला मागायचें नाहीं.

"......तुला माझ्या घरांत नाइलाजानें राहण्याची आवश्यकता नाहीं. सुदैवानें तुझें थोडें शिक्षण झालें आहे. कोठेंही पोटाला चार घांस मिळवून खा.

" मी तुझ्या नोकरीची व्यवस्था करूं का ? " कुमारच्या शब्दांत त्यांची मनोव्यथा आणि दृढनिश्चय कांठोकांठ भरली होती.

" कुमार रागवूं नका माझ्यावर. तुम्ही रागावलांत म्हणजे पायाखालची जमीन खचतेशी वाटते मला. "

" तुझी इच्छा काय आहे तें स्पष्ट सांग. कोणावरही रागावणें व्यर्थ असतें. माझ्या रागानें आज तूं माझ्याजवळ राहशील. काय उपयोग त्याचा ? तुझ्या मनाला तें खाईल, आणि लवकरच मला वाटूं लागेल ' ही जाईल तर बरें. '

इब्सेननें आपल्या एका नाटकांत म्हटलें आहे, ' मनुष्य प्रिय व्यक्तीसाठीं जीव देऊं शकतो, जीवन देऊं शकत नाहीं. ' कारण, प्राण एकदांच भावनावेगांत द्यायचे असतात. उलट, जीवन म्हणजे अनेक त्यागांची माला गुंफायची असते.

"...तुझी इच्छा काय आहे ? राहण्याची कीं जाण्याची ? " राधेनें त्यांचा हात घट्ट दाबला आणि हातांचीं बोटें ओंठाला लावलीं.

कुमारच्या मुद्रेवर स्मित झळकलें. त्यांनीं तिला आपल्या बाहुपाशांत घेतलें.

" जीवन, तुझी इच्छा मला शिरसावंद्य आहे. तुझ्या भावनाही मला तितक्याच पवित्र वाटतात. तुझ्याबद्दल माझ्या भावना कशाही असोत. आजपासून तूं माझी सखी, सहचरी झालीस. जगाच्या दुःखाचा वांटा उचलण्याची माझी धडपड, तुझ्या जिवाला कांटा टोंचलेला मला कसा सहन होईल ?

" मला तुझ्याकडून कसलीही अपेक्षा नाहीं. माझें प्रेम अहेतुक आहे. प्रेममूर्तीची पूजा मला करतां येते हें मी तुला पटवून देईन. राधा ! वासनापूर्ति म्हणजे प्रेम नव्हे. दोन जीव एकांत एक पूर्णपणें मिळून एकजीव झाले म्हणजे त्यांतून निरनिराळे रंग आपोआप उत्पन्न होतात. आपल्या जीवनांत इतकी समरसता येणें कठीण. तूं मला सखी, प्रेयसी नव्हे बहीणच आहेस तोंवर.

" लाडके जीवन ! तुझ्या जिवाचा थरकांप होऊं देऊं नकोस. तुझ्य स्पर्शापेक्षांही तुझा सहवास, तुझी प्रेमदृष्टि मला प्रिय आहे. विश्वासा मजकडे पाहणारी नजर भयभीत होईल, तिच्यांत परकेपणाचें विष काल वेल अशी वेडी चूक माझ्याकडून कधीं घडणार नाहीं. माझ्या अपेक्ष सामान्य असत्या तर त्यांची पूर्ति कधींच झाली असती. "

कुमार थांबले.

चतुर्दशीचा नाजुक चंद्र क्षितिजावर मस्तक उचलीत होता. आत पावेतों चांगला उजेड झाला होता. बाहेर पक्ष्यांची प्रसन्न चिंवचिंव ऐ येऊं लागली. थंडगार वाऱ्याची झुळुक अंगाला झोंबूं लागली.

कुमारनीं राधेचा हात धरुन तिला उठविली. खोलीच्या खिडकींतू पूर्वेला चाललेली रंगपंचमी तिला दाखविली.

" राणी, प्रसन्न निसर्गाची शोभा तुझ्या मुखावर लिहिते आहे. "

' आयुष्य सौंदर्यपूर्ण आहे. जीवन मधुरिमा आहे—सुषमा आहे. '

तुझ्या पायाला कांटा लागला आहे. पण तेवढ्यासाठीं खेळ थांबवां ही खेळाडूवृत्ति नव्हे.

चल, जग आपल्याला बोलावतें आहे. आपण ह्या मधुर जीवनाच आनंद लुटूं. प्रियतम सखे, आयुष्य ही एक कला आहे. तें एक मनोर चित्र आहे. त्याच्यावर कलंक लावून त्याची शोभा नष्ट करणें पाप आहे

उगवत्या भास्वानाबरोबर आपणही जगांत पुनः प्रवेश करूं या— निधड्या छातीनें पुढें सरूं या. अनेक विदीर्ण झालेल्या जीवांना थो सहाय्य करूं या.

समाप्त